cmyk

## संपादकीय

### बांगलादेशात आगडोंब; झळ भारताला

तुम्ही मित्र बदलू शकता पण शेजारी नाही, इतिहास बदलू शकता पण भूगोल नाही', असे भारताचे माजी पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयींनी पाकिस्तानात जाऊन १९९९ मध्ये एक ऐतिहासिक वाक्य उच्चारले होते. भारताच्या 'नेबरहूड पॉलिसी'बद्दल भूमिका मांडताना त्यांनी उच्चारलेले हे वाक्य कुणीही आणि कधीही विसरू नये एवढे महत्त्वाचे आहे. 'शेजारधर्म' या शब्दात शेजार आणि धर्म असे दोन शब्द आहेत. शेजारी आपण बदलू शकत नाही, हे त्यावेळी वाजपेयी यांना वाटल्यामुळे, धर्म पाळण्याचे दायित्व त्यांनी अधोरेखित केले. भारत आशिया खंडाच्या दक्षिण भागात स्थित देश आहे.


दैनिक
# राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com


### आश्रम शाळांमधील ३३३ विद्यार्थ्यांना विषबाधा

पालघर : आश्रमशाळेत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांच्या आरोग्याशी खेळ सुरु असल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. आदिवासी आश्रम शाळांमधील ३३३ विद्यार्थ्यांना विषबाधा झाली आहे. पालघर मधील डहाणू आदिवासी विकास प्रकल्प अंतर्गत आश्रम शाळांत हा संतापजनक प्रकार घडला आहे.

बीड – महाराष्ट्र | वर्ष – ४ | अंक–१०८ | गुरूवार दि.०८ ऑगस्ट २०२४ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | • पाने– ६ | किंमत ३ रूपये

# दुष्काळग्रस्त मराठवाडा सुजलाम सुफलाम होणार

## राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत १३ सर्वात मोठे निर्णय; वैनगंगा–नळगंगा नदीजोड प्रकल्पाला मंजुरी

**मुंबई । प्रतिनिधी**

**राज्य मंत्रिमंडळाची बुधवारी अतिशय महत्त्वाची बैठक पार पडली. या बैठकीत १३ महत्त्वाचे आणि मोठे निर्णय घेण्यात आले. यामधील पहिला निर्णय हा वैनगंगा–नळगंगा नदीजोड प्रकल्पास मंजुरी देण्याबाबत घेण्यात आला. राज्य सरकारच्या या योजनेमुळे मराठवाडा सुजलाम सुफलाम करण्यास सरकारला मोठे यश मिळणार आहे.**

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली बुधवारी राज्य मंत्रिमंडळाची अतिशय महत्त्वाची बैठक पार पडली. या बैठकीत १३ मोठे निर्णय घेण्यात आले आहेत. विशेष म्हणजे राज्य सरकारचा अतिशय महत्त्वकांक्षी असलेल्या वैनगंगा –नळगंगा नदीजोड प्रकल्पास आजच्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली आहे. या प्रकल्पामुळे तब्बल पावणेचार लाख हेक्टर जमीन सिंचनाखाली येणार आहे. त्यामुळे दुष्काळाच्या झळा भोगणाऱ्या शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळणार आहे. शेतकरी आत्महत्याग्रस्त जिल्ह्यांमध्ये ◀◀ पान २ वर




### विना परवानगी झाड तोडल्यास आता ५० हजार दंड

विना परवानगी झाड तोडल्यास आता ५० हजार दंड वसूल करण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते. सध्या १ हजार रुपये दंडाची तरतूद आहे. दंडाशिवाय अशारितीने तोडलेले कोणतेही झाड आणि ते वाहून नेण्यासाठी वापरलेली हत्यारे, नौका, वाहने सरकारजमा करण्यात येतील. या संदर्भातील दुरुस्ती महाराष्ट्र वृक्षतोड (नियमन) अधिनियम १९६४ मधील कलम ४ मध्ये करण्यात येऊन अध्यादेश मांडण्यात येईल.

### लहान शहरांतील पायाभूत सुविधांना वेग येणार

लहान शहरांतील पायाभूत सुविधांना वेग देण्यासाठी कर्ज स्वरुपात निधी उपलब्ध करून देण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. महाराष्ट्र अर्बन इन्फ्रास्ट्रक्चर फंड मार्फत खुल्या बाजारातून कर्ज घेऊन हा निधी उभारण्यात येईल. महाराष्ट्र नागरी पायाभूत सुविधा विकास कर्ज योजना अशा या योजनेतून नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना स्व हिश्याचा निधी उभारता येईल. या कर्जासाठी अपात्र ठरणाऱ्या नागरी संस्थांना या योजनेत कर्ज मिळेल. केंद्राच्या अमृत–२ योजनेत छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेस मंजूर पाणी पुरवठा प्रकल्पातील स्व हिश्यातील ८२२ कोटी २३ लाख रक्कम एमयूआयडीसीएल / एमयूआयएफने कर्ज स्वरुपात प्राधान्याने मंजूर करावी आणि आवश्यकता भासल्यास शासन या संस्थांना अग्रिम निधी मंजूर करेल. कर्जाची उभारणी झाल्यानंतर अग्रिम रक्कम एमयूआयडीसीएल/एमयूआयएफने शासनास परत करावी. या योजनेतल्या कर्जाची नागरी स्थानिक स्वराज्य संस्थाने परतफेड न केल्यास त्यांना शासनाकडून मिळणाऱ्या जीएसटी, वित्त आयोगाचे अनुदान, मुद्रांक शुल्क परतावा यामधून कर्ज व व्याजाच्या हप्त्याची रक्कम परस्पर वळती करण्यात येईल.

#### पोलिस अधिक्षक नंदकुमार ठाकुर यांची बदली

## अमरावतीहून आलेले अविनाश बारगळ बीडचे नवे एसपी

**बीड । प्रतिनिधी**

**पोलिस अधिक्षक नंदकुमार ठाकुर यांची कार्यकाळ पुर्ण झाल्याने बदली झाली असून त्यांच्या जागेवर अमरावतीहून आलेले अविनाश बारगळ हे बीडचे नवे एसपी असणार आहेत.**




अमरावती येथे गुन्हे अन्वेषण विभागाचे पोलिस अधिक्षक अविनाश बारगळ हे बीडचे आता एसपी म्हणून बदली झाल्याने येणार आहेत. पोलिस अधिक्षक नंदकुमार ठाकुर यांचा बीड येथील कार्यकाळ पुर्ण झाला आहे. त्यामुळे त्यांची बदली करण्यात आली आहे. अद्याप त्यांना पदस्थापना देण्यात आली नाही. त्यांचा बीड जिल्ह्यातील कार्यकाळ हा समाधानकारक ◀◀ पान २ वर

# पवार-फडणवीसांचा नव्हे तर मी फक्त मराठा समाजाचा माणूस

## मनोज जरांगे यांचे प्रकाश आंबेडकरांना प्रत्युत्तर

**सोलापूर । प्रतिनिधी**

**मी कुणाचा माणूस आहे यावर कुणाला कुणाचा मेळ लागेना, मी फक्त आणि फक्त मराठा समाजाचा माणूस आहे आणि माझा मालक मराठा समाज आहे असे सांगत मनोज जरांगे यांनी प्रकाश आंबेडकरांना प्रत्युत्तर दिले आहे. विधानसभेची निवडणूक लढवायची की नाही याचा निर्णय २९ तारखेला होईल, एकतर उमेदवार उभा करायचे किंवा पाडापाडी करायचे असे आवाहन त्यांनी मराठा समाजाला केले. मनोज जरांगे याचा पश्चिम महाराष्ट्र दौरा सुरू झाला असून ते सोलापुरातील शांतता रॅलीत बोलत होते.**




प्रकाश आंबेडकरांनी केलेल्या टीकेला उत्तर देताना मनोज जरांगे म्हणाले की, आधी ते म्हणाले की देवेंद्र फडणवीसांसोबत सुरू असलेले भांडण हे नकली आहे. त्यानंतर लगेच नांदेडमध्ये म्हणाले की मी शरद पवारांचा माणूस आहे. त्यांचे त्यांनाच मेळ लागेना मी कुणाचा माणूस आहे ते. मी कुणाचा हे कोडे त्यांना उलगडूच शकत नाही, कारण तोवर ते पडलेले असतील. मी फक्त मराठा समाजाचा आहे, माझा मालक फक्त मराठा समाज आहे. बाकी कुणाला गणतीत धरत नाही. शेवटच्या श्वासापर्यंत मी मराठा आरक्षणासाठी लढणार असा शब्द मी मराठा समाजाला दिला असल्याचे ◀◀ पान २ वर

### आरक्षण ओबीसीतूनच घेणार

मराठ्यांविरुद्ध बोलणाऱ्यांचा सुफडा साफ करणार, आणि मीही मराठ्यांना आरक्षण दिल्याशिवाय हटू शकत नाही. आता, एकही मराठा घरात नाही बसू शकत, जातीवान मराठा पक्षात नाही राहू शकत. कारण, त्याल जात मोठी करायची आहे. आम्ही आक्रोश मोर्चा काढणार नाही, दंगल होणार नाही, सगळं शांततेतच होणार. पण, मी आरक्षण ओबीसीतूनच घेणार, असेही जरांगे यांनी म्हटले.

## लाडकी बहिणीसाठी खुशखबर ३ हजार रू. १७ ऑगस्टला मिळणार

### पात्र महिलांच्या बँक खात्यात दोन हप्ते एकाच वेळी जमा होणार

**मुंबई । प्रतिनिधी**

**लाडकी बहीण योजनेसाठी महिलांकडून मोठ्या प्रमाणात अर्ज केले जात आहेत. त्यातच, आता, लाडक्या बहिणींसाठी आणखी एक गुडन्यूज आली आहे. त्यानुसार, १७ ऑगस्ट रोजीच या योजनेचा पहिला हफ्ता ३००० रुपये महिलांच्या बँक खात्यात जमा होणार आहे. त्यामुळे, रक्षाबंधनापूर्वीच बहिणींना ओवाळणी मिळणार असल्याचे स्पष्ट झालं आहे.**

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचा पहिला हप्ता १७ ऑगस्टलाच मिळणार असून याबाबत शासन दरबारी निर्णय झाला आहे. विशेष म्हणजे १७ ऑगस्ट रोजी राज्य सरकारकडून



भव्य दिव्य कार्यक्रमाच्या माध्यमातून हे पैसे वितरीत केले जाणार आहेत. आजच्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत यावर निर्णय घेण्यात आल्याची माहिती आहे. या कार्यक्रमाला एकाच मंचावरती मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्री उपस्थित असणार आहेत. तर, प्रत्येक जिल्ह्यामध्ये पालकमंत्री या कार्यक्रमातून उपस्थित राहतील. १७ ऑगस्टला दोन ते अडीच कोटी महिलांना पहिला हप्ता देण्याच्या संदर्भामध्ये राज्य सरकारचा विचार असल्याचीही माहिती आहे. मात्र, राज्य सरकारच्या या निर्णयामुळे योजनेसाठी पात्र झालेल्या ◀◀ पान २ वर

## तीन केंद्रप्रमुखांना दिला बेकायदेशीररित्या शिक्षण विस्तार अधिकाऱ्याचा पदभार

### गेवराईच्या गटशिक्षणाधिकाऱ्यांचा प्रताप

**बीड । प्रतिनिधी**

**जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आणि प्राथमिक विभागाचे शिक्षणाधिकारी यांना अंधारात ठेवून गेवराई पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारी सोनवणे यांनी तीन केंद्रप्रमुखाची ज्येष्ठ शिक्षणाधिकारी पदावर बेकायदेशीर रित्या नियुक्ती केली आहे गटशिक्षणाधिकाऱ्यांनी परस्पर केलेल्या या प्रतापामुळे 'हम करे सो कायदा' या वृत्तीप्रमाणे गेवराई तालुक्यातील शिक्षण विभागाचा कारभार सुरू आहे. अर्थपूर्ण व्यवहारातून झालेल्या या तात्पुरत्या नियुक्तीमुळे मात्र शिक्षकांनी संताप व्यक्त केला आहे.**

गेवराई तालुक्यामध्ये ज्येष्ठ शिक्षण विस्तार अधिकाऱ्यांची ०६ मान्य पदे आहेत. सध्या गेवराई येथे दोन शिक्षण विस्तार अधिकारी कार्यरतआहेत. रिक्त पदे असल्याच्या नावाखाली गटशिक्षणाधिकारी महोदयांनी चक्क आयुक्ताचे अधिकार वापरून तीन केंद्रप्रमुखांना ज्येष्ठ शिक्षण विस्तार अधिकारीपदी नियुक्ती दिली आहे सदर नियुक्ती देण्यासाठी त्यांनी शिक्षणाधिकारी ◀◀ पान २ वर

## बीड मतदारसंघात वीज वितरणासंबंधीचे सर्व विषय मार्गी लावा-आ.संदीप क्षीरसागर

**बीड । प्रतिनिधी**

**बीड मतदारसंघात वीज वितरणासंबंधीच्या असलेल्या नागरिक, शेतकरी यांच्यासाठी महत्वपूर्ण असलेले सर्व प्रलंबित व प्रस्तावित विषय मार्गी लावण्याची मागणी आ.संदीप क्षीरसागर यांनी केली आहे. यामध्ये शेतकऱ्यांना शेतीपंपाचे नवीन वीज कनेक्शन जोडणी, विविध योजनेंतर्गत रोहित्र तसेच तत्सम साहित्य मागणीचे प्रस्तावांचा तात्काळ निपटारा वीज वितरण कंपनी कडून करण्यात यावा अशी मागणी आ.संदीप क्षीरसागर यांनी केली आहे.**



बीड मतदारसंघ क्षेत्रातील बीड शहर, बीड तालुका व शिरूर का. तालुक्यातील वीज वितरणासंबंधी शेतकरी आणि नागरिकांच्या अनेक मागण्या आहेत. यामध्ये प्रामुख्याने पाली येथील मंजूर असलेल्या ३३/११ के.व्ही. उपकेंद्राचे अद्यापपर्यंत काम सुरु झालेले नाही. तसेच म्हाळसजवळा, नामलगाव, पिंपळवाडी, बेलुरा येथील ३३/११ के.व्ही. उपकेंद्राचे कामही पूर्ण झालेले नाही. याबाबत परिसरातील गावातील नागरिक या उपकेंद्राचे काम पूर्ण करून सदरील उपकेंद्र लवकरात लवकर कार्यरत करावे अशी मागणी करत आहेत. बीड मतदारसंघात शेतकऱ्यांना नवीन वीज कनेक्शन तसेच नवीन रोहित्र देण्यात यावे. ज्याठिकाणी शेतीपंपासाठी नवीन वीज कनेक्शन देण्यात आले आहे, त्याठिकाणी ओव्हरलोड मुले रोहित्र ◀◀ पान २ वर

## कृषी पूरक साहित्याचे वितरण शेतकऱ्यांना ताबडतोब करावे-धनंजय मुंडे

### कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी मंत्रालयात घेतला आढावा

**मुंबई । प्रतिनिधी**

**महाराष्ट्र कृषी उद्योग विकास महामंडळामार्फत उपलब्ध करून देण्यात आलेले पॉवर स्प्रे पंप शेतकऱ्यांना तात्काळ उपलब्ध करून देण्यात यावे, कोल्हापूर व सांगली जिल्ह्यातील तसेच राज्यातील पूरबाधित क्षेत्रातील शेतकऱ्यांना पीक विमा योजनेत नुसानभरपाई देण्याच्या अनुषंगाने नुकसानीचे पंचनामे तातडीने करण्यात यावे, तसेच विविध योजनांसाठी वितरित करण्यात आलेला निधी शेतकऱ्यांच्या खात्यात ताबडतोब वर्ग करण्यात यावा असे आदेश कृषी मंत्री धनंजय मुंडे यांनी आज दिले.**

कृषी विभागाच्या विविध योजनांचा आढावा घेण्यासाठी ◀◀ पान २ वर



### बाजारभाव

**कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड,दि.०६ ऑगस्ट २०२४**

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| शेतमाल (आवक) | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू :२.५० क्विंटल | २,६५० | २,९९० | २,८२० |
| ज्वारी/हायब्रिड :३९.५० क्विंटल | २,००० | ३,३०० | २,३४७ |
| मूग :१४.५० क्विंटल | १,९५० | ३,०४१ | २,४५५ |
| तूर : २.०० क्विंटल | ९,४०१ | ९,४०१ | ९,४०१ |
| उडीद : २.५० क्विंटल | ४,९०१ | ७,४०० | ६,१५० |
| बाजरी: ११.०० क्विंटल | २,००० | ३,४०० | २,७९६ |
| चिंच/लोकल: २०.०० क्विंटल | १,१०० | ३,५५० | २,३२५ |
| सोयाबीन: १३.०० क्विंटल | ४,२६० | ४,३०० | ४,२८० |
| हरभरा: ५.०० क्विंटल | ५,७०१ | ७,३५० | ६,५८३ |

## समीर गुलामनबी काझी यांचा उद्या भव्य नागरी सत्कार

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

**बीड – महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाच्या अध्यक्ष ( राज्यमंत्री दर्जा ) तथा महाराष्ट्र राज्य हज कमिटीच्या सदस्य पदी समीर गुलामनबी काझी यांची निवड झाली असून बीड येथे त्यांचा निवडीबद्दल भव्य नागरी सोहळा दिनांक ९ ऑगस्ट रोजी सायंकाळी सहा वाजता आयोजित करण्यात आला आहे.**



समीर गुलाम नबी काझी यांची महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाच्या अध्यक्ष तथा महाराष्ट्र राज्य हाच कमिटीच्या सदस्य पदी निवड झाल्याबद्दल रोटरी क्लब परिवार, क्रेडाई परिवार, बागवान बिरादरी पंच कमिटी आणि काझी सेवा संघ महाराष्ट्र यांच्या वतीने दिनांक नऊ ऑगस्ट रोजी सायंकाळी सहा वाजता आशीर्वाद लॉन्स सोमेश्वर मंदिर जवळ गोल्डन चॉईस हॉटेल समोर, बार्शी रोड बीड येथे आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याच्या आवाहन अंबाजोगाई येथील लोहिया ट्रेडर्स अँड हार्डवेअर चे मालक राधेश्याम लोहिया यांनी केले आहे.






cmyk

अग्रलेख

# बांगलादेशात आगडोंब; झळ भारताला

तुम्ही मित्र बदलू शकता पण शेजारी नाही, इतिहास बदलू शकता पण भूगोल नाही', असे भारताचे माजी पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयींनी पाकिस्तानात जाऊन १९९९ मध्ये एक ऐतिहासिक वाक्य उच्चारले होते. भारताच्या 'नेबरहूड पॉलिसी'बद्दल भूमिका मांडताना त्यांनी उच्चारलेले हे वाक्य कुणीही आणि कधीही विसरू नये एवढे महत्त्वाचे आहे. 'शेजारधर्म' या शब्दात शेजार आणि धर्म असे दोन शब्द आहेत. शेजारी आपण बदलू शकत नाही, हे त्यावेळी वाजपेयी यांना वाटल्यामुळे, धर्म पाळण्याचे दायित्व त्यांनी अधोरेखित केले. भारत आशिया खंडाच्या दक्षिण भागात स्थित देश आहे. क्षेत्रफळानुसार भारत जगातील सातव्या क्रमांकाचा आणि लोकसंख्येच्या बाबतीत दुसऱ्या क्रमांकाचा सर्वात मोठा देश आहे. भारताची सीमा अफगाणिस्तान, पाकिस्तान, चीन, भूतान, नेपाळ, म्यानमार, बांगलादेश, मालदीव आणि श्रीलंका या सात देशांशी संलग्न आहे. त्यातील आपला शेजारी देश असलेल्या बांगलादेशात सध्या हिंसाचार अन्? जाळपोळीचा आगडोंब उसळला आहे. पंतप्रधान शेख हसीना यांनी राजीनामा देत देश सोडला आहे. सैन्याने देशाचा कारभार हाती घेतला असला तरी देखील हिंसाचार थांबलेला नाही. शेख हसीना यांच्या अवामी लीग पक्षाची कार्यालये, नेत्यांची घरे आणि हॉटेल्सना आगी लावल्या जात आहेत. इतकेच नाही तर उन्मादी जमावाने शेख हसीना यांच्या घरात घुसून लुटालूट केली आहे. या भयावह परिस्थितीमुळे येथे व्यापार करणाऱ्या भारतीय कंपन्याही संकटात सापडल्या आहेत. या कंपन्यांच्या व्यापारावर त्यांचा परिणाम होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. बांगलादेशात आजमितीस डाबरपासून ट्रेंटपर्यंत अनेक भारतीय कंपन्या काम करत आहेत. त्याचप्रमाणे, बांगलादेशमध्ये १९ हजार भारतीय असून त्यापैकी ९ हजार विद्यार्थी आहेत. भारतीय सीमा रक्षकांना बांगलादेशच्या परिस्थितीबाबत सतर्क राहण्यास सांगितले आहे, अशी माहिती परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर यांनी दिली आहे तसेच बांगलादेशातील अल्पसंख्याक हिंदू कुटुंबीयांवर हल्ले सुरु आहेत ही चिंताजनक बाब आहे. दुसऱ्या बाजूला देशातील गंभीर परिस्थिती लक्षात घेऊन शेख हसीना यांनी फक्त पंतप्रधानपदाचा राजीनामाच दिलेला नाही, तर आपल्या बहिणीसह देशदेखील सोडला आहे.

तब्बल २० वर्षांपेक्षा अधिक काळ सत्तेच्या राजकारणात सक्रिय असलेल्या हसीना यांना भारतात आश्रय घ्यावा लागला आहे. बांगलादेश या देशाची निर्मितीच मुळात भारताने केली. त्याविषयीच्या राजकारण आणि युद्धाच्या कहाण्या अनेक ठिकाणी, अनेक कार्यक्रमांतून प्रसारित झाल्या आहेत. या देशाच्या निर्मितीनंतर काही महिन्यांतच हसीना यांचे वडील मुजिब उर रहमान यांची हत्या झाली आणि त्यानिमित्ताने तिथल्या भारतविरोधी गटाने तोंड वर काढल्याची चिन्हे समोर आली होती. आज तिथला धार्मिक मूलतत्त्ववादही वाढीला लागला आहे. मुळात भारत आणि बांगलादेशमध्ये गेल्या ५३ वर्षांपासून द्विपक्षीय संबंध आहेत. त्यात सलग १५ वर्षांपासून बांगलादेशात शेख हसीना यांच्या नेतृत्वाखाली अवामी लीगचे सरकार होते. मागील वर्षी नवी दिल्लीत जी-२० शिखर परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. या परिषदेत भारताने बांगलादेशला विशेष पाहुणा म्हणून आमंत्रण दिले होते. हसीना यांची सत्ता संपुष्टात आल्याने भारतासमोर अनेक अडचणी निर्माण होऊ शकतात. शेख हसीना यांच्या सत्ताकाळात त्यांनी भारतासोबत चांगले संबंध राहतील याचा प्रयत्न केला असला तरी, स्वत:च्या देशातील आरक्षणाच्या आंदोलनानंतर बिघडलेल्या परिस्थितीचा त्यांना अंदाज आला नाही, असेच म्हणावे लागेल.

बांगलादेशातले सत्ताकारण हे शेख हसीना वाजेद आणि खालिदा झिया या दोन महिलांभोवती गेले अनेक वर्षं फिरत आहे. बांगलादेशात नवे सरकार स्थापन होईपर्यंत, लष्कराचा ताबा असला तरी, खालिदा आणि अन्य विरोधी गटाचा वाढता प्रभाव हा भारताला भविष्यात डोकेदुखी ठरू शकतो. त्याचे कारण बांगलादेशातील या हिंसाचाराच्या हालचालीवर चीन लक्ष ठेवून आहे. भारतातील कापड केंद्र तिरुपूरला कापड मागणीत दहा टक्क्यांची वाढ अपेक्षित आहे. अमेरिका, युरोपातील प्रमुख ब्रँडचा कल भारताकडे वाढू शकतो. या परिस्थितीचा फायदा भारताला होऊ शकतो. असे असले तरी आज ज्या भारतीय कंपन्या बांगलादेशात काम करत आहेत, त्यांना मात्र या संकटाचा फटका बसण्याची दाट शक्यता व्यक्त केली जात आहे. बांगलादेशातील संकट पाहता आशिया खंडातील सर्वात मोठी विमा कंपनी एलआयसीने बांगलादेशातील कार्यालये ७ ऑगस्टपर्यंत बंद ठेवण्याचा निर्णय घेतला आहे. बांगलादेशात ज्या भारतीय कंपन्यांनी मोठी गुंतवणूक केली आहे, त्यात मॅरिको, इमामी, डाबर, एशियन पेन्टर, पीडिलाइट, गोदरेज, सन फार्मा, टाटा मोटर्स, हिरो मोटोकॉर्प या मोठ्या कंपन्यांचा समावेश आहे. अराजकतेचं संकट वाढत चालल्याने या कंपन्यांवर प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष दोन्ही पद्धतींनी दुष्परिणाम होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. या आंदोलनाने बांगलादेशला अशा वळणावर आणून ठेवले आहे की, देशाच्या भवितव्यावर अनिश्चिततेचे काळे ढग कधी दूर होतील हे आता सांगता येत नाही.त्यामुळे त्याची झळ भारतालाही बसत असली तर शेजार धर्म म्हणून बांगलादेशात शांतता प्रस्थापित करण्यासाठी भारताला पुढाकार घ्यावा लागणार आहे.

# वादळी वाऱ्यामुळे सोलार पंपचे नुकसान



**घनसावंगी। प्रतिनिधी**

**घनसावंगी तालुक्यातील बोरगाव खुर्द येथे ४ ऑगस्ट रोजी झालेल्या जोरदार वादळी वार्यामुळे व पावसामुळे सोलार पंप बाजुला पडून मोठे नुकसान झाले. ही घटना बोरगाव खुर्द शिवारातील गट नंबर ५८ मधील शेतकरी सुधाकर खेमाजी कोळे यांच्या शेतात घडली.**

शेतकरी सुधाकर कोळे यांनी त्यांच्या शेतात मुख्यमंत्री सौर कृषी पंप योजनेअंतर्गत स्पॅन पंप सौलार कंळपनीचे ५ एचपीचे सोलार पंप घेतले होते. मात्र ४ ऑगस्ट रोजी झालेल्या वादळी वार्यामुळे व पावसामुळे या सोलार पंपचे मोठे नुकसान झाले आहे. तसेच सोलार पपाचे पाट्याचे नुकसान झाले. सदरील नुकसानग्रस्त झालेल्या सोलार पंपाचा पंचनामा करण्यात आला आहे. तरी शासनाकडून मदत मिळावी अशी मागणी अण्णासाहेब भानुसे, शिवाजी राठोड, ज्ञानेश्वर सर्जेराव भानुसे, राजेंद्र थोरात, कौशल्या भानुसे यांनी केली आहे. याबाबतचा पंचनामा सरपंच कौशल्या अण्णासाहेब भानुसे व ग्रामसेवक यांच्याकडे सादर केला.

# अल्पसंख्याक संशोधन व प्रशिक्षण संस्थेच्या स्थापनेस राज्य मंत्रिमंडळाची मंजुरी

## अल्पसंख्याक संस्था संघटनांनी मानले उपमुख्यमंत्री तथा वित्तमंत्री अजित पवार यांचे आभार

**मुंबई । प्रतिनिधी**

**राज्यातील अल्पसंख्याक बांधवांचे मागासलेपण दूर करुन त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी टार्टी', 'बार्टी', 'सारथी', 'महाज्योती', 'अमृत'च्या धर्तीवर 'अल्पसंख्याक संशोधन व प्रशिक्षण संस्था म्हणजे 'एमआरटीआय'ची स्थापना करण्याचा राज्य मंत्रिमंडळाने आज घेतलेला निर्णय म्हणजे उपमुख्यमंत्री तथा वित्त व नियोजनमंत्री अजित पवार यांच्या प्रयत्नांचे यश असल्याचे सांगत राज्यातील अनेक मुस्लिम तसेच अल्पसंख्यांक बांधवांच्या संस्था, संघटनांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे अभिनंदन केले आहे.**

राज्यातील मुस्लिम तसेच अल्पसंख्याक बांधवांच्या विकास योजनांना गती देण्यासाठी उपमुख्यमंत्री तथा वित्तमंत्री अजित पवार सातत्याने प्रयत्नशील आहेत. त्यांच्याच प्रयत्न व पाठपुराव्यामुळे महायुती सरकारने अल्पसंख्याक आयुक्तालय स्थापन करण्याचा निर्णय यापूर्वीच घेतला असून त्याची कार्यवाही सध्या अंतिम टप्प्यात आहे. अल्पसंख्याक समुदायासाठी 'टार्टी', 'बार्टी', 'सारथी', 'महाज्योती', 'अमृत'च्या धर्तीवर 'अल्पसंख्याक संशोधन व प्रशिक्षण संस्था म्हणजे 'एमआरटीआय' स्थापन करण्याचा निर्णय विचाराधीन होता. आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत त्यास मान्यता देण्यात आली. राज्यातील महायुती सरकारमध्ये अल्पसंख्याक बांधवांची बाजू भक्कमपणे मांडण्याची तसेच त्यांच्यासाठी विकासयोजना तयार करण्याची जबाबदारी उपमुख्यमंत्री अजित पवार सातत्याने पार पाडत आले आहेत. त्यांनी नुकत्याच सादर केलेल्या अर्थसंकल्पात मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळाकडून राबवण्यात येणाऱ्या योजनांकरिता कर्जावरील शासन हमीची मर्यादा ३० कोटी रुपयांवरून ५०० कोटी रुपयांपर्यंत वाढविण्यात आली आहे. अल्पसंख्याक समुदायातील विद्यार्थ्यांना २०२४-२५ पासून विदेशी शिक्षणासाठी शिष्यवृत्ती योजना लागू करण्याची घोषणाही अर्थसंकल्पात करण्यात आली आहे. तत्पूर्वी, यावर्षी, ११ मार्च रोजीच्या मंत्रिमंडळ बैठकीत छत्रपती संभाजीनगर येथे अल्पसंख्याक आयुक्तालय तसेच जिल्हास्तरावर अल्पसंख्याक कक्ष स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. आता 'अल्पसंख्याक संशोधन व प्रशिक्षण संस्था' 'एमआरटीआय' स्थापन करण्याचा निर्णयही त्यांच्याच पुढाकाराने घेण्यात आला आहे. अल्पसंख्याक संशोधन व प्रशिक्षण संस्थेसाठी एकूण ११ पदे निर्माण करण्यास मान्यता देण्यात आली आहे. त्याचप्रमाणे या संस्थेच्या आस्थापनेवरील पदांचे वेतन, कार्यालयीन खर्च, मागासलेपणाचा अभ्यास करण्यासाठी, प्रशिक्षणासाठी एकूण ६ कोटी २५ लाख रुपयांच्या खर्चासही मंत्रिमंडळाने मान्यता दिली आहे, अशी माहिती उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिली.



# साकळगावच्या जनतेनी केला परिवर्तनाचा निर्धार

## शाखा उद्घाटन सोहळाः सतीश घाटगे पाटलांच्या सभेस मोठा प्रतिसाद

**घनसावंगी । प्रतिनिधी**

**तालुक्यातील गावागावांत समृध्दी कारखान्याचे चेअरमन सतीश घाटगे हे विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर वातावरण ढवळून काढत आहे. रविवारी साकळगावात भारतीय जनता पार्टीच्या १६२ व्या शाखेचा उदघाटन सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला. या कार्यक्रमास गावातील जनतेनी मोठा प्रतिसाद मिळाला.**

तळागाळातील प्रत्येक घटकाच्या कल्याणासाठी भारतीय जनता पार्टीचे सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते समर्पण वृत्तीने काम करत असल्याने गावागावात सर्व घटकातील जनता भाजपसोबत जुडत आहे. येणाऱ्या काळात घनसावंगी विधानसभेत परिवर्तन निश्चित होणार, असा विश्वास सतीश घाटगे यांनी याप्रसंगी बोलताना दिला. साकळगावातील शाखा उदघाटन प्रसंगी असंख्य युवक व ज्येष्ठ कार्यकर्त्यांनी भाजप मध्ये जाहीर प्रवेश केला. नूतन शाखेतील सर्व पदाधिकारी, सदस्यांसह भारतीय जनता पार्टीत प्रवेश केलेल्या सर्वांचे सतीश घाटगे यांनी पक्षात स्वागत करून सत्कार केला. यावेळी कामगार विभागाचे जिल्हाध्यक्ष, गोविंद आर्दड, विकास शिंदे, माधव टेहळे, ज्ञानेश्वर काळे, रामेश्वर गरड,भगवान तौर, हनुमान आर्दड,किसन कोरडे, गणेश कोरडे,राम साबळे, विकास साबळे, शाखाध्यक्ष रमेश जाधव, राजेभाऊ देशमुख, भिमराव जाधव, नामदेव वाघमारे,विशंभर चव्हाण, सुदाम धोत्रे, विष्णुपंत गाडेकर,संतोष वाळके,रोहित मुळे अशोक गाडेकर, संतोष हरदास, बालाजी काकडे, भागवत खाडे, नानाभाऊ शिकारे, रोहित मुळे, बाबासाहेब वाघमारे, पिनू भले, रामदास धोत्रे, रामजी मोगरे, दत्ता माने, श्याम काळे, सुभाष पांढरे, ज्ञानेश्वर नाईकनवरे, सतीश जाधव यांची प्रमुख उपस्थिती होती.

# पान १वरून...

### दुष्काळग्रस्त मराठवाडा

मोठ्या प्रमाणावर सिंचन निर्माण करून या भागातील शेतीला समृद्ध करणाऱ्या महत्वाकांक्षी वैनगंगा नळगंगा नदीजोड प्रकल्पास आज झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. ८७ हजार ३४२ कोटी ८६ लाख रुपयांच्या या प्रकल्पामुळे पावणेचार लाख हेक्टर क्षेत्राचे सिंचन होणार असून विशेषत: मराठवाड्यासारख्या दुष्काळग्रस्त भागाला मोठा फायदा होणार आहे. या प्रकल्पामुळे गोदावरीच्या उपखोऱ्यातून वैनगंगेतील पाणी बुलढाणा जिल्ह्यातील वैनगंगा प्रकल्पात आणण्यात येईल. यासाठी एकूण ४२६.५२ कि.मी.चे जोड कालवे बांधण्यात येतील. विदर्भातील नागपूर, वर्धा, अमरावती, यवतमाळ, अकोला, बुलढाणा या जिल्ह्यातील १५ तालुक्यांना सिंचन तसेच पिण्याचे पाणी आणि औद्योगिक कारणासाठी याचा उपयोग होईल. रब्बी हंगामात पाण्याचा वापर करता यावा म्हणून ३१ साठवण तलाव देखील बांधण्यात येणार आहेत. राष्ट्रीय जलविकास अभिकरणामार्फत याचा सविस्तर प्रकल्प अहवाल २०१८ मध्ये सादर करण्यात आला होता. केंद्रीय जल आयोगाने देखील यास मान्यता दिली असून राज्य जलपरिषदेच्या बैठकीत हा प्रकल्प एकात्मिक राज्य जल आराखड्यात समाविष्ट करण्यात आला आहे.

**प्रकल्पबाधितांना सदनिका उपलब्ध करण्याच्या धोरणास मान्यता**

प्रकल्पबाधितांना सदनिका उपलब्ध करून देण्याच्या धोरणास आज झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. कल्पग्रस्तांच्या सदनिकांच्या निर्मितीमध्ये वाढ होण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला. या धोरणानुसार बृहन्मुंबई महानगरपालिका, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण आणि एमएमआरडीए यांनी पुढील १५ वर्षात पुरेशा प्रमाणात प्रकल्पग्रस्त सदनिका निर्माण होण्यासाठी सविस्तर कृती आराखडा तयार करावयाचा आहे. या प्राधिकरणानी पुढील ३-५ वर्षात किती प्रकल्पग्रस्त सदनिकांची आवश्यकता आहे याचा आढावा घ्यावयाचा आहे. हा प्रकल्प आर्थिकदृष्ट्या वर्धनक्षम ठरण्यासाठी टीडीआर निर्मिती आणि त्याची उपयोगिता यातील तरतुदीत सुधारणा देखील कराव्या लागतील. बृहन्मुंबई महानगरपालिका, म्हाडा यांच्याकडून राबविण्यात येणाऱ्या प्रकल्पांमध्ये निर्माण होणाऱ्या अतिरिक्त सदनिका या प्रकल्पग्रस्त सदनिका म्हणून वापरात आणण्यात येतील.

**शिक्षकांना शिक्षण पात्रता परीक्षेसाठी दोन वर्षे मुदतवाढ**

आदिवासी विभागातील प्राथमिक शिक्षकांना शिक्षण पात्रता परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठी दोन वर्षे मुदतवाढ देण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला. १ डिसेंबर २०१८ अन्वये ही विशेष भरती मोहिम राबविण्यात आली होती. यातील नियुक्ती मिळालेल्या प्राथमिक शिक्षकाना ही मुदत देण्यात येत आहे. ही परीक्ष उत्तीर्ण झाल्यापासून पुढील काळात त्यांना सेवाविषयक लाभ देण्यात येतील. ही मुदतवाढ देण्यापूर्वीच्या कालावधीत शिक्षक पात्रता परीक्षा उत्तीर्ण झालेल्या प्राथमिक शिक्षकांना पुढील सेवाविषयक लाभ देण्यात येतील. ही मुदतवाढ केवळ एक वेळची बाब म्हणून देण्यात येत आहे. या मुदतवाढी नंतरही जे शिक्षक परीक्षा उत्तीर्ण होणार नाहीत त्यांच्या सेवा समाप्त करण्यात येतील.

**जात, वैधता प्रमाणपत्र मिळण्यातल्या अडचणी दूर होणार**

आता जात प्रमाणपत्रांचे समितीमार्फत पुनर्विलोकन करता येईल. अनुसूचित जाती जमातीच्या जात, वैधता प्रमाणपत्र मिळण्यातल्या अडचणी दूर करण्यासाठी महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियम २०००) मध्ये सुधारणा करण्याचा निर्णय देण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला. चुकीच्या नोंदीच्या आधारे वैधता प्रमाणपत्र देण्यात आल्याचे दिसून आल्यास अशा प्रकरणात प्रमाणपत्राची पुन्हा पडताळणी करण्याची तरतूद नसल्याने हे प्रमाणपत्र रद्द करण्यात अडचणी येतात. त्यामुळे वैधता प्रमाणपत्राचे पुनर्विलोकन या समितीमार्फत करण्याची तरतूद करण्यात येईल. याशिवाय समितीच्या आदेशाविरुद्ध केवळ उच्च न्यायालयात अपिलाची तरतूद आहे. त्यामुळे अनेक न्यायालयीन प्रकरण प्रलंबित आहेत. म्हणून उच्च न्यायालयात प्रकरण जाण्यापूर्वी एक अपिलिय प्राधिकरण देखील गठीत करण्यात येईल. जात प्रमाणपत्र अवैध झाल्यास सध्या २ हजार ते २० हजार रुपये दंडाची तरतूद आहे. मात्र त्यात वाढ करणे गरजेचे असून आता या कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी एफआयआर देखील दाखल करण्याची तरतूद करण्यात येईल. समिती सदस्यांना न्यायालयामार्फत दंड लावला जातो. त्यादृष्टीने देखील सदस्यांना संरक्षण मिळण्यासाठी कायद्यात तरतूद करण्यात येईल.

**महाराष्ट्र लॉजिस्टिक धोरण राबविणार**

महाराष्ट्र लॉजिस्टीक धोरण-२०२४ ला आज झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते. राज्य आर्थिक सल्लागार परिषदेने केलेल्या शिफारसीनुसार लॉजिस्टीक धोरण तयार करण्यात आले आहे. हे धोरण पुढील १० वर्षातील विकासाला समोर ठेऊन तयार करण्यात आले आहे. या धोरणामुळे राज्यात सुमारे ५ लाख इतकी प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रोजगार निर्मिती होणार आहे. यातून सुमारे ३० हजार ५७३ कोटी उत्पन्न मिळेल असे अपेक्षित आहे. सध्याच्या १४-१५टक्के च्या तुलनेत लॉजिस्टिकचा खर्च किमान ४-५टक्के ने कमी करणे, लॉजिस्टिकसाठी लागणारा वेळ कमी करणे, विविध उपाययोजनांद्वारे हरित उपक्रम राबवून कार्बन उत्सर्जन कमी करणे, ब्लॉक चेन, कृत्रिम बुध्दीमत्ता, इंटलीजन्ट लॉजिस्टीक मॅनेजमेंट सिस्टमचा वापर, ग्रीन लॉजिस्टिक पार्कचा प्रसार, शाश्वत डिझाईन,मोडल शिफ्ट या बाबी समाविष्ट आहेत. या क्षेत्रात देशांतर्गत व परदेशी गुंतवणूक आकर्षित करणे, तसेच महाराष्ट्राला जागतिक दर्जाचे लॉजिस्टिक हब दर्जा मिळवण्याचा प्रयत्न असेल. हे धोरण तयार करतांना महाराष्ट्र मेरिटाईम बोर्ड, जवाहरलाल नेहरु पोर्ट प्राधिकरण, मुंबई पोर्ट ट्रस्ट, राज्य रस्ते विकास महामंडळ, एमएमआरडीए, सिडको, महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी यांचा सहभाग घेण्यात आला आहे. या धोरणांतर्गत राज्यात २०२९ पर्यंत १० हजार एकरहून अधिक क्षेत्रावर समर्पित लॉजिस्टिक पायाभूत सुविधा विकसित करण्यात येतील. यात आंतरराष्ट्रीय मेगा लॉजिस्टीक हब म्हणून पनवेल येथील नवीन आंतरराष्ट्रीय विमानतळाशी संलग्न नवी मुंबई-पुणे क्षेत्रात २ हजार एकरवर इंटरनॅशनल मेगा लॉजिस्टिक हबचा विकसित करण्यात येईल. त्याच्याशी नवी मुंबई ते पुणे हे क्षेत्र तळोजा, पाताळगंगा, रसायने, खोपोली, महाड, रोहा, चाकण,तळेगांव या औद्योगिक वसाहती संलग्न असल्यामुळे हे क्षेत्र आंतराष्ट्रीय स्तरावरील व्यापार व उद्योगांचे प्रमुख केंद्र होईल. या हबच्या विकासासाठी पंधराशे कोटीची तरतूद करण्यात येईल.

**नॅशनल मेगा लॉजिस्टीक हब**

नागपूर- वर्धा नॅशनल मेगा लॉजिस्टिक हब हे पंधराशे एकरवर उभारण्यात येईल. हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र समृद्धी महामार्गाशी जोडला असून, नागपूर जिल्ह्याचे देशातील वैशिष्ट्यपूर्ण भौगोलिक केंद्रीय स्थानामुळे लॉजिस्टिक हबच्या विकासासाठी अनुकूल आहे. जिल्ह्यात ४ राष्ट्रीय द्रुतगती मार्ग आणि एक समर्पित मालवाहतूक कॉरिडॉर प्रगतीपथावर असून जिल्हा पूर्वीपासून मालवाहतूक करण्याचे प्रमुख केंद्र म्हणून ओळखला गेला आहे. या हबसाठी देखील पंधराशे कोटीची तरतूद करण्यात येईल.

**राज्य लॉजिस्टीक हब**

छत्रपती संभाजी नगर-जालना, ठाणे-भिवंडी, रत्नागिरी-सिंधुदूर्ग, पुणे- पुरंदर व पालघर- वाढवण या ५ ठिकाणी प्रत्येकी ५०० एकरवर राज्य लॉजिस्टीक हब लॉजिस्टीक सुविधा उपलब्ध करतील. या पाच हबसाठी २ हजार ५०० कोटीची तरतूद करण्यात येईल.

**प्रादेशिक लॉजिस्टीक हब**

नांदेड-देगलूर, अमरावती बडनेरा , कोल्हापूर-इचलकरंजी नाशिक सिन्नर व धुळे-शिरपूर या पाच ठिकाणी प्रत्येकी ३०० एकर जागेवर प्रादेशिक हब उभारण्यात येईल. या पाच प्रादेशिक लॉजिस्टीक हबच्या विकासासाठी पंधराशे कोटीची तरतूद करण्यात येईल.

**जिल्हा लॉजिस्टीक नोडस**

राज्यातील प्रत्येक जिल्ह्याची मुलभूत क्षमता, अंतर्भूत उद्योग व्यवसायाच्या संधी व पारंपारीक कौशल्याच्या आधारे निर्माण झालेली आर्थिक विकासाची केंद्रे याच्या समन्वयातून व विश्लेषणातून २५ जिल्हा लॉजिस्टीक नोडस तयार करण्यात येतील. यात प्रत्येक जिल्ह्यात किमान २ ते ३ ठिकाणी अशी एकूण १०० एकर क्षेत्रावर जिल्ह्याची दोन-तीन प्रमुख उद्योग व्यापार व व्यवसायची ठिकाणे हब आणि स्पोक मॉडेल अंतर्गत जोडली जातील. जिल्ह्यातील एमआयडीसी क्षेत्रातील १५ टक्के क्षेत्र खाजगी क्षेत्रातील लॉजिस्टीक नोडस साठी राखीव ठेवण्यात येतील.

याशिवाय राज्यात लॉजिस्टीक पार्क विकसकासाठी वित्तीय प्रोत्साहन अनुदान ही देण्यात येईल. या धोरणांतर्गत विहित केलेल्या झोन आणि झोन मधील वर्गवारीमध्ये स्थापित होणाऱ्या पात्र लॉजिस्टीक पार्क यांना भांडवली अनुदान देण्यात येईल. ते पुढीलप्रमाणे लघु लॉजिस्टिक पार्क: किमान ५ एकर जागेवर उभारण्यात येणाऱ्या हबसाठी किमान १० कोटी गुंतवणूक असलेल्या घटकांना २० टक्के भांडवली अनुदान देण्यात येईल. मोठा लॉजिस्टिक पार्क: किमान ५० एकर जागेवर उभारण्यात येणाऱ्या हबसाठी आणि किमान १०० कोटी गुंतवणूक असलेला घटकांना १५ टक्के भांडवली अनुदान देण्यात येईल. विशाल लॉजिस्टिक पार्क: किमान १०० एकर जागेवर उभारण्यात येणाऱ्या हबसाठी किमान २०० कोटी गुंतवणूक असलेल्या घटकांना १५ टक्के भांडवली अनुदान देण्यात येईल. अतिविशाल लॉजिस्टिक पार्क: किमान २०० एकरवरील हबसाठी आणि किमान ४०० कोटीची गुंतवणूक असलेल्या घटकांना १० टक्के भांडवली अनुदान देण्यात येईल. तसेच या सर्व लॉजिस्टीक पार्कना औद्योगिक दराने वीज, निर्णायक औद्योगिक पायाभूत सहाय्य व ग्रीन लॉजिस्टीक सहाय्य दिले जाणार आहे. झोन ,झोन व झोन मधील स्थापित होणाऱ्या लघु,मोठे, विशाल, अतिविशाल व बहुमजली लॉजिस्टीक पार्क यांना लॉजिस्टीक घटकांना उद्योग व पायाभूत क्षेत्र दर्जा, ग्राउंड कव्हरेज मध्ये सवलत, झोन निर्बंधामध्ये शिथिलता,उंचीच्या निर्बंधामध्ये शिथिलता,ऑपरेशन्स २४७,कौशल्य व उद्योजकता विकासासाठी सहाय्य तसेच एकल खिडकी प्रणाली,व्यवसाय सुलभता अशी बिगर वित्तीय प्रोत्साहन देण्यात येतील.

**बहुउद्देशिय लॉजिस्टीक पार्क**

शहरी/निमशहरी भागात किमान २० हजार चौ.फुट बांधीव क्षेत्र असलेल्या क्षेत्रास ''बहुमजली लॉजिस्टीक पार्क'' असे संबोधले जाईल व किमान गुंतवणूक ५ कोटी इतकी राहील. ठाणे,मुंबई व पुणे या महानगरांमध्ये खुल्या जागेची उपलब्धतेमध्ये अडचणी असल्याने, जागेचा जास्तीत वापर होण्यासाठी बहुउद्देशीय लॉजिस्टीक पार्क प्रस्तावित करण्यात आले आहेत. प्रत्येक जिल्हयातील ६ (प्रथम १०० घटकांना) लॉजिस्टीक पार्कच्या आतील तसेच प्रत्येक जिल्हयातील ६ (प्रथम १०० घटकांना) लॉजिस्टीक पार्कच्या बाहेरील एमएसएमई स्टोरेज आणि कार्गो हाताळणी घटकांना व्याज अनुदानासह मुद्रांक शुल्क सवलत, औद्योगिक दराने वीज, तंत्रज्ञान सुधारणा सहाय्य व व्यवसाय सुलभता असे वित्तीय प्रोत्साहन देण्यात येईल. तसेच उद्योग व पायाभूत क्षेत्र दर्जा,ग्राउंड कव्हरेज मध्ये सवलत,झोन निर्बंधामध्ये शिथिलता,उंचीच्या निर्बंधामध्ये शिथिलता,ऑपरेशन्स २४७,कौशल्य व उद्योजकता विकासासाठी सहाय्य तसेच एकल खिडकी प्रणाली,व्यवसाय सुलभता असे बिगर वित्तीय प्रोत्साहन देण्यात येईल. लॉजिस्टीक क्षेत्रातील एमएसएमईना (जमिन किंमत वगळून ५० कोटी गुंतवणूक मर्यादा असणारे घटक) कोणत्याही प्रकारच्या पूर्वपरवानगी पासून सूट देण्यात आली आहे. तसेच त्यांच्या अडीअडचणीवर मात करण्यासाठी राज्य शासन मैत्री कक्षाद्वारे आवश्यक सुविधा उपलब्ध करुन देण्यात येतील.

**न्यायमूर्तींना सेवा निवृत्तीनंतर घरकामगार, वाहनचालक सेवा**

न्यायमूर्तींना सेवा निवृत्तीनंतर घरकामगार, वाहनचालक सेवा असे अनुज्ञेय सेवानिवृत्तीनंतरचे लाभ देण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. मुंबई उच्च न्यायालयाचे सेवानिवृत्त मुख्य न्यायमूर्ती आणि अन्य न्यायमूर्ती यांना किंवा मृत्यू पश्चात त्यांच्या पती किंवा पत्नीस लाभ देण्यात येतात. हे लाभ मुंबई उच्च न्यायालयात न्यायमूर्ती म्हणून नियुक्त झालेल्या पण इतर राज्याच्या उच्च न्यायालयातून सेवानिवृत्त झालेल्या किंवा मृत्यू पश्चात त्यांच्या हयात पती किंवा पत्नीस देण्यास आज मान्यता देण्यात आली.

---------------------

### पवार-फडणवीसांचा नव्हे तर मी

मनोज जरांगे म्हणाले. मी फुटत नाही म्हणून सरकार लावालावीचं काम करतंय असा आरोपही त्यांनी केला. येत्या २९ तारखेला अंतरवालीत या असे आवाहन मनोज जरांगे यांनी केले. ते म्हणाले की, मराठ्यांनी १०० टक्के मतदान करायचं. एकदा का उमेदवार उभा केला तर त्याच्या मागे उभा राहायचे. उमेदवार उभे करायचे ठरले नाही, निवडणूक लढायची ठरली नाही तर मग पाडापाडी करायची, जरांगे म्हणाले.

------------

### बीड मतदारसंघात वीज वितरणासंबंधीचे

जळण्याच्या घटना मोठ्या प्रमाणात घडत आहेत. अशा ठिकाणी तातडीने दुरुस्ती करण्यात यावी. यासोबतच मतदारसंघातील विविध निकषपात्र ठिकाणांवर महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाच्या आर.डी.एस.एस. व एन.एस.सी. योजनेंतर्गत प्रातवित कामांना मंजुरी देऊन तात्काळ कामे पूर्ण करण्यात यावीत अशी मागणी आ.संदीप क्षीरसागर यांनी वीज वितरण कंपनीकडे केल्या आहेत.

--------------

### तीन केंद्रप्रमुखांना दिला बेकायदेशीररित्या

किंवा मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद यांची मान्यता घेतली नाही. गेवराई पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारी सोनवणे यांनी गेवराई येथील तीन केंद्रप्रमुखांना विस्तार अधिकारी पदावर अधिकार नसताना नियुक्ती दिली आहे. गेवराई तालुक्यातील शेळके गोविंद, मोरे संजय मनोहर, शेमे विठ्ठल एकनाथ या तीन केंद्रप्रमुखांना बेकायदेशीररित्या विस्तार अधिकारी केल्यामुळे गेवराई तालुक्यात संताप करण्यात आला. गेवराई पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारी सोनवणे यांनी चक्क मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद, बीड आणि विभागीय आयुक्त यांचे अधिकार वापरून केलेल्या बेकायदेशीर नियुक्त यांची चौकशी करण्यात यावी, आणि संबंधिताविरुद्ध कारवाई करावी अशी मागणी करण्यात आली आहे.

--------------

### लाडकी बहिणीसाठी

महिला भगिनींना मोठा दिलासा मिळाला आहे. तालुका, जिल्हा आणि राज्य स्तरावर महिलांच्या आलेल्या अर्जांची आकडेवारी समोर येत आहेत. त्यामध्ये, महिला भगिनींचे मंजूर अर्ज, प्रलंबित अर्ज आणि नामंजूर अर्जही देण्यात येत आहेत. तर, प्रलिंबित अर्जांमधील काही त्रुटी दुरुस्त करुन ते मंजूर केले जाणार आहेत. तर, नामंजूर करण्यात आलेल्या अर्जांना पुन्हा नव्याने अर्ज भरण्यासाठी मुदत देण्यात आली आहे. आतापर्यंत १ कोटी ४० लाख अर्ज दाखल झाले असून त्यापैकी १ कोटी अर्जांची छानणी ही पूर्ण झालेली आहे. आगामी विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर राज्य सरकारने मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेची घोषणा केली असून आता त्याची अंमलबजावणीही सुरू झाली आहे. या योजनेचा पहिला हप्ता ररक्षाबंधनच्या मुहूर्तावर दिला जाणार आहे. जुलै आणि ऑगस्ट महिन्यांचा एकत्रित हप्ता म्हणजेच ३ हजार रुपये लाभार्थी महिलांच्या बँक खात्यात थेट १७ ऑगस्ट रोजी जमा होणार आहेत.

--------

### अमरावतीहून आलेले अविनाश

राहीला असून अधिकारी म्हणून त्यांची बीड जिल्ह्यातील सामान्य नागरीकांशी नाळ जुळली होती. अविनाश बारगळ यांची बीड पोलिस अधिक्षक म्हणून बदली झाली असून लवकरच ते पदभार स्विकारणार असल्याचे समजते. त्यांच्याबरोबर विनयकुमार राठोड यांची पोलिस उपायुक्त, वाहतुक, ठाणे शहर येथून पोलिस अधिक्षक छत्रपती संभाजीनगर, विजय मगर यांची पोलिस उपायुक्त पुणे शहर येथून प्राचार्य, पोलिस प्रशिक्षण केंद्र, लातूर, अविनाश कुमार यांची अप्पर पोलिस अधिक्षक, नांदेड येथून पोलिस अधिक्षक, नांदेड येथे बदली करण्यात आली आहे.

-----------

### कृषी पूरक साहित्याचे वितरण

मंत्रालयात आयोजित बैठकीत कृषिमंत्री धनंजय मुंडे बोलत होते. या बैठकीस कृषी विभागाच्या अप्पर मुख्य सचिव श्रीमती व्ही राधा, नानाजी देशमुख कृषी संजीवनी योजना प्रकल्प संचालक परिमल सिंह, बाळासाहेब ठाकरे ग्रामीण कृषी विकास प्रकल्प संचालक हेमंत वसेकर, कृषी संचालक विनायकुमार आवटे, सर्व विभागीय कृषी सहसंचालक, सर्व जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, प्रकल्प संचालक आत्मा व इतर अधिकारी उपस्थित होते. बैठकीत बोलताना कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी राज्यात ९९ टक्के पेरण्या पूर्ण झालेल्या असल्यामुळे शासनाच्या विविध योजनांचा माध्यमातून डीबीटी पोर्टल वर नोंदणी केलेल्या शेतकऱ्यांना द्यावयाचे कृषी पूरक उपकरणे, निविष्ठा यांचे वितरण त्वरित करण्यात यावे. नॅनो युरिया, डीएपी, पावर स्प्रे पंप, स्टोरेज बॅग, मेटल दिहाईड आदी साहित्य शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्यात यावे, असे निर्देश दिले तसेच विविध योजनांच्या अंमलबजावणीत येणाऱ्या व प्रत्यक्ष शेतकऱ्यांना भासणाऱ्या अडचणींच्या बाबत आढावा घेण्यात आला.

दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
गुरुवार दि. ८ ऑगस्ट २०२४


## दूध भेसळ रोखण्यासाठी तपासणी करण्याचे निर्देश

जालना : दुधातील भेसळ रोखण्यासाठी जिल्हयातील दूध व दुग्धजन्य पदार्थांची विक्री करणारे सर्व परवानाधारक, वितरक, दुकान, स्टॉल इत्याादींना संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांनी प्रत्याक्ष भेट देऊन तपासणीत भेसळ आढळल्यास कार्यवाई करण्याचे निर्देश जिल्हास्तरीय दूध भेसळ समितचे अध्यक्ष तथा अपर जिल्हाधिकारी रिता मेत्रेवार यांनी दिले आहेत. दुधातील भेसळीमुळे दुध उत्पादक शेतकऱ्यांच्या दुधाला रास्त दर मिळत नाही. तसेच दुध भेसळीमुळे जनतेच्या आरोग्यावरही विपरीत परिणाम होतो. राज्यातील जनतेला स्वच्छ व गुणवत्तापूर्ण दुधाचा पुरवठा होण्याच्या अनुषंगाने दूध व दुग्धजन्य पदार्थात होणारी भेसळ रोखण्यासाठी शासन निर्णयअन्वये शासनाने जिल्हास्तरावर समितीचे अध्यक्ष म्हणून जिल्हयाचे अपर जिल्हाधिकारी यांना घोषीत केले आहे. तसेच अपर पोलिस अधिक्षक जालना, सहाय्यक आयुक्त (अन्न) अन्न व औषध प्रशासन, जालना, जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त, जालना, उपनियंत्रक वैद्यमापनशास्त्र, जालना हे सदस्य म्हणून नियुक्त करण्यात आले आहेत. समितीचे सदस्य सचिव म्हणून जिल्हा दुग्धव्यवसाय विकास अधिकारी हे काम पाहतात. दूध भेसळ रोखण्याच्या अनुषंगाने जालना जिल्हयातील विविध दूध व दुग्धजन्य पदार्थ यांचे एकूण ४४ नमुने घेण्यात येवुन तपासणीसाठी ते प्रयोगशाळेत पाठविण्यात आले. त्याापैकी ३८ नमुने प्रमाणित आले असून ३ नमुने कमी दर्जाचे आले असल्याने दंडात्मक कारवाईसाठी वरीष्ठ कार्यालयात प्रस्ताव दाखल करण्यात आला आहे. उर्वरित ३ नमुन्याचे अहवाल प्रलंबित आहेत.

दरम्यान, दूध भेसळ रोखण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयात झालेल्या समितीच्या बैठकीत दूध व दुग्धजन्य पदार्थांबाबत जिल्हयातील सर्व प्रकारच्या परवानाधारक/वितरक/दुकान/स्टॉल इत्याादी ठिकाणी प्रत्याक्ष भेट देऊन भेसळीबाबत कार्यवाई करण्याचे निर्देश समिती अध्यक्षांनी दिले आहेत.

# कडा सहकारी साखर कारखाना पूर्ववत सुरू करण्यासाठी क्रांती दिनानिमित्त राष्ट्रवादी काँग्रेस व कामगार युनियनचे धरणे आंदोलन -राम खाडे

**म्हसोबावाडी । प्रतिनिधी**

आष्टी पाटोदा शिरूर तालुक्यातील शेतकऱ्यांच्या हितासाठी दुष्काळी भागात साखर कारखाना उभा करण्यासाठी जेष्ठ स्वातंत्र्या सैनिक कै. साहेबराव थोरवे (दादा) यांनी पुढाकार घेऊन गावोगावी फिरून शेतकऱ्यांचे शेअर्स जमा केले. त्यांचे सोबत दादासाहेब खिल्लारे, आसराजी (अण्णा) जगताप, भाऊसाहेब वाळके, मा खा रखमाजी गावडे, तानाजी गर्जे, नारायणराव नरवडे, कारभारी देवकर, वामनराव वाव्हाळ, नामदेवराव भवर, नारायण देसाई, कंटाळे, कराळे,मा आ निवृत्तीराव उगले इत्याादी चळवळीतील कार्यकर्ते सहभागी होते.

आष्टी तालुक्यात सन १९७२ च्या दुष्काळानंतर या कारखाना उभारण्याची मोहीम काँग्रेसच्या राजवटीत घेण्यात आलेली होती. कै. श्रीपतराव कदम हे आमदार झाल्यानंतर या कडा सहकारी साखर कारखान्याच्या कामास गती प्राप्त झाली. सन १९७८ साली उभारणी सुरू केली व सन १९८० साली मा खा शरदचंद्रजी पवार साहेब यांच्या हस्ते उद्घाटन होऊन गाळप सुरू करण्यात आले. १२५० टनी क्षमतेचा साखर कारखाना या भागातील विकासाला चालना देणारा ठरला. प्रत्योकी १००० रुपये शेअर्सची किंमत ठेवून ६००० शेतकरी सभासद करण्यात आलेले होते. विशेष म्हणजे उद्घाटन अगोदर पहिली निवडणूक झाली त्याामध्ये कै. साहेबराव थोरवे (दादा) यांचा संपूर्ण पॅनल विजयी झाला. यांच्या कार्यकाळात कारखाना नफ्यात होता. कारखान्यात ७०० कामगार कार्यरत होते. या कारखान्यासाठी जळगाव परिसरातील शेतकऱ्यांनी अत्यांत कमी दरात जमिनी दिल्या होत्याा. काही जमीन गायरान होती. तब्बल २५० एकर जमिनीवर हा कारखाना उभा आहे. बकवाल या नामांकित कंपनीची मशिनरी असून पूर्ण क्षमतेने गाळप झालेले आहे.

दि महाराष्ट्र स्टेट को ऑप बँकेच्या ताब्यात कडा साखर कारखाना असून नियोजना अभावी व गैरव्यवस्थापनामुळे कारखाना तोट्यात गेलेला होता. कर्जाच्या रकमेत व्याजासह वाढ झाल्यामुळे कारखाना बँकेने विक्रीस काढलेला आहे. कडा सहकारी साखर कारखाना राजकीय कुरघोडीमुळे डबघाईला आला. नियोजनाअभावी उसाचे गाळप झाले नाही.



सन २००० नंतर राजकीय कुरघोडीतून कारखान्याची वाताहत झाली. सन २००७-२००८ सुपरटेक फोर्जिंग इंडिया लिमिटेड भोसरी पुणे च्या माध्यमातून पुन्हा चालू करण्याचा प्रयत केला तो अयशस्वी झाला. बँकेचे कर्ज, जिल्हा बँकेचे कर्ज, अतिरिक्त कामगार भरती, कामगारांचे देणे, कार्यक्षेत्राबाहेरील ऊसाची वाहतूक इत्याादी कारणामुळे कारखाना विक्रीस गेला. जवळपास ५० कोटीचे देणे आहे याबरोबर शेतकऱ्यांचे उसाचे पेमेंट, ऊसतोड ऊसतोडणी कामगार, वाहतूक इत्याादी बुडीत खात्याात जमा झालेले आहेत. आष्टी तालुक्याचे वैभव असलेल्या साखर कारखान्याची कृत्रिमरित्याा हत्याा झालेली आहे. या कारखान्याकडे २५० एकर जमीन आहे. राज्य सहकारी बँकेने हा साखर कारखाना विक्रीस काढलेला आहे तो भंगारात विकून जमीन हडप करण्याचे षडयंत्र सुरू आहे. भारतीय जनता पक्षाचे हे अपयश आहे. या कारखान्याचे नेतृत्व भारतीय जनता पक्षाचे लोकप्रतिनिधी करीत होते. तालुक्याच्या विकासासाठी त्याांनी प्रयत न करता हेतू पुरस्कर दुर्लक्ष केले. हा कारखाना पूर्ववत सुरू करण्यात यावा यासाठी मा खा श्री शरदचंद्रजी पवार साहेब (राष्ट्रीय अध्यक्ष राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष ) यांच्याकडे आष्टी तालुक्याच्या वतीने शेतकरी, कामगार, उद्योजक, शेतमजूर यांनी साकडे घातलेले आहे. आष्टी पाटोदा शिरूर या तिन्ही तालुक्यातील जनतेच्या जिव्हाळ्याचा प्रश्न असून या साखर कारखान्यामुळे जवळपास २ हजार कुटुंबांना रोजगार मिळते, दळणवळण सुरू होते, कारखाना परिसरातील बँक, पोस्ट ऑफिस, शाळा, महाविद्यालय, इत्याादी उद्योग धंद्यामुळे हा परिसर गजबजलेला असतो. मा खा शरदचंद्रजी पवार साहेब व मा आ जयंतराव पाटील साहेब यांनी जातीने लक्ष देऊन साखर कारखाना पूर्ववत सुरू करावा. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे (शरदचंद्रजी पवार गट) लोकसभा सदस्य खासदार बजरंग (बप्पा) सोनवणे यांना जनतेने विजयी केल्यामुळे व त्याांना साखर कारखाना चालविण्याचा अनुभव लक्षात घेता त्यांच्या मार्गदर्शनाखाली साखर कारखाना पूर्ववत सुरू करण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरदचंद्रजी पवार गट) व कामगार युनियन यांच्या संयुक्त विद्यमाने कडा कारखाना परिसरातील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यासमोर गुरुवार दिनांक ८ ऑगस्ट २०२४ रोजी क्रांती दिना निमित्त सकाळी १० ते दुपारी ४ वाजेपर्यंत धरणे आंदोलन संपन्न होणार आहे. या धरणे आंदोलनात मतदासंघातील सर्वांनी उपस्थित रहावे असे आवाहन राम खाडे, अध्यक्ष आष्टी विधानसभा, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरदचंद्रजी पवार गट) यांनी केले आहे.




दिव्याखाली अंधार तालुक्याचे मुख्य कार्यालय असणाऱ्या पंचायत समिती मध्ये प्रवेश दौऱ्याची रस्त्याची अवस्था.. छाया शरद रेडेकर

## स्वनिधी समृद्धी योजना अंतर्गत स्कीम लिंकेज शिबिर संपन्न

अंबड । प्रतिनिधी

नगर परिषद अंबड च्या वतीने स्वनिधी से समृद्धी स्कीम लिंकेज शिबिराचे आयोजन ७ ऑगस्ट रोजी करण्यात आले होते. कोरोना काळात हातावर पोट असणाऱ्या एकूण ६५६ पथ विक्रेते लाभार्थी यांना १० हजार रुपये चे कर्ज उपलब्ध करून दिले आहे. शहरातील पीएम स्वनिधी योजना अंतर्गत कर्ज प्राप्त पात्र पथविक्रेते यांचा प्रथम सामाजिक व आर्थिक सर्वेक्षण करून यांना विविध योजना साठी जोडणी करण्यात आली. या शिबिरामध्ये कामगार विभाग तहसील कार्यालय वित्त विभाग आरोग्य विभाग आणि महिला व बालकल्याण विभाग अंतर्गत असणाऱ्या प्रधानमंत्री श्रमयोगी मानधन



योजना, इमारत बांधकाम कामगार नोंदणी, प्रधानमंत्री मातृत्व वंदन योजना, प्रधानमंत्री जननी सुरक्षा योजना, प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजना, प्रधानमंत्री जीवन ज्योती विमा योजना व एक रेशन एक देश अंतर्गत नवीन रेशन कार्ड बनवणे अशा विविध योजनांशी जोडणी करण्यात आली आहे. या विविध योजना अंतर्गत एकूण ३०० लाभार्थ्यांची नोंदणी करण्यात आली आहे. या शिबिरामध्ये नगर परिषद अंबड चे मुख्याधिकारी श्री मनोज उकिरडे यांची प्रमुख उपस्थिती होती तसेच सहायक प्रकल्प अधिकारी श्री संजीव मैंद, समुदाय संघटक श्री शरद मगर, संजय परदेशी, नायब तहसीलदार श्रीमती मोरे तसेच आरोग्य विभाग व सर्व बँकर्स यांची उपस्थिती होती.

## पान ६ वरून...

### केज-अंबाजोगाई विधानसभा

त्याांचा राजकीय प्रवास पाहता विरोधकांसह जनतेला ही लक्षात येते की ते स्वतःच्या फायद्यासाठी कपडे बदलल्यासारखे पक्ष बदलतात. कधी एका पक्षात तर कधी दुसऱ्या पक्षात. अशा कोलांटउड्या सातत्याने यांच्याकडून सुरू असतात. सध्या भाजपला अनुकूल वातावरण नसल्याचे पाहून यांनी पुन्हा एकदा उडी मारून दुसऱ्या पक्षात जाण्याचे ठरविले आहे. लवकरच ही बाब जनतेसमोर येणार आहे. असेही ॲड. शेख शफीक भाऊ म्हणाले. या मतदारसंघात गेल्या अनेक वर्षांपासून जनता मुंदडा कुटुंबीयांना साथ देत आहे. सध्या असलेल्या आमदार ताईंच्या सासू या मतदारसंघात अनेक वर्षे आमदार राहिल्या होत्याा. त्याांच्यानंतर आता त्याांच्या सुनबाई येथे प्रतिनिधित्व करीत आहेत. त्याांना गेल्या पाच वर्षाच्या काळात मतदार संघासाठी, मतदार संघातील जनतेसाठी ठोस आणि भरीव असे कार्य करता आले नाही. मात्र गेल्या महिन्या-दोन महिन्यांपासून या आमदार ताई सातत्याने प्रसिद्धी माध्यमातून आपल्या रिमोट कंट्रोल द्वारे बातम्यांचा रतीब घालीत आहेत. म्हणजे केले काही नाही पण प्रसिद्धी माध्यमातून नुसता कालवाच सुरू आहे. असा टोमणाही शफिक भाऊंनी मारला. जनहिताची कामे फक्त एमआयएम पक्षच करू शकतो. आपला पक्ष मजबूत करण्यासह जनतेसाठी विकासाची कामे आपल्याला करायची आहेत. ही गोष्ट लक्षात घ्यावी आणि विधानसभा निवडणुकीसाठी तयारीला लागावे. जिथे कुठे पक्षश्रेष्ठींचे मार्गदर्शन हवे असेल तिथे सांगावे. मार्गदर्शन करण्यासाठी सर्व पक्षश्रेष्ठी आणि वरिष्ठ पदाधिकारी सदैव तत्पर व तयार आहेत. असेही शफिक भाऊंनी सांगितले. यामुळे तालुक्यातील सर्व पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांमध्ये उत्साह व आत्मविश्वास संचारलेला पहावयास मिळाला. यावेळी बीडहून शफिक भाऊंसह आलेले युवक जिल्हाध्यक्ष तथा नगरसेवक शेख मतीन, ज्येष्ठ नेते अब्दुस्सलाम सेठ, जिल्हा समन्वयक सय्यद सैफअली उर्फ़ लालु भैय्या, बीड शहर उपाध्यक्ष शेख शाकेर, जिल्हा सहसचिव अन्वर पाशा, मराठवाडा सोशल मीडिया एडमिन शेख मुदस्सिर, सय्यद अब्दुस्सलाम, सय्यद आदील, सोहील मोमीन यांचीही प्रमुख उपस्थिती होती.

### कवडगाव येथील जि.प.

पसार झाला असल्याचे चित्र पाहावयास मिळत आहे. हे सामान अक्षरशा खराब होत आहे. यामध्ये सिमेंटचे पोते. लोखंडी अँगल. पाण्याच्या टाक्या. पाईप. दरवाजे सह इतर सामायन खराब होत आहे. या शाळेत तात्काळ स्वच्छालय उभारावे अशी मागणी कवडगाव ग्रामपंचायत सदस्य तथा पत्रकार सतीष सोनवणे. मच्छिंद्र कानडे. अनिल नांदुरकर. गंगुबाई करे यांनी वडवणी गटशिक्षणाधिकारी उजगरे सर यांच्याकडे लेखी स्वरुपात केली आहे. तसेच या शाळेसाठी विद्यार्थ्यांना पिण्याच्या पाण्यासाठी फिल्टर आलेले असून ते फिल्टरसुद्धा बसवण्या अभावी धुळखात पडले आहे. ते फिल्टर सुद्धा खराब होण्याची शक्यता आहे. वडवणी तालुक्यातील अनेक जिल्हा परिषद शाळेसाठी रेडिमेट शौचालय व पिण्याच्या पाण्याचे फिल्टर आलेले असून हे साहित्या संबंधित कंत्राटदार शाळेत टाकून पसार झाला आहे. वडवणी तालुक्यातील कवडगाव.पिंपरखेड. पुसरा.जिल्हा परिषद शाळेला आलेले रेडिमेट शौचालय व पिण्याच्या पाण्याचे फिल्टर तात्काळ बसून घ्यावे असे लेखी निवेदन ग्रामपंचायत सदस्य तथा पत्रकार सतीष सोनवणे यांनी वडवणीचे गटशिक्षण अधिकारी बाबासाहेब उजगरे यांना निवेदनाद्वारे केली आहे. वडवणी तालुक्यातील बऱ्याच जिल्हा परिषद शाळेसाठी रेडिमेट शौचालय व पिण्याच्या पाण्याचे फिल्टर आलेले आहे.हे साहित्या संबंधित कंत्राटदार शाळेत टाकून पसार झाले आहेत.याविषयी लक्ष घालून तात्काळ बसवण्यासाठी प्रयत करणार.(बाबासाहेब उजगरे गटशिक्षणाधिकारी वडवणी..)कवडगाव येथील जि.प. शाळेत तात्काळ स्वच्छालय व फिल्टर पाण्याची व्यवस्था करावी.

(ग्रा.पं. सदस्य सतीष सोनवणे.)

### सैदापूर येथे आजपासून अखंड

वतीने महाराष्ट्रभरातील नामांकित कीर्तनकारांना पाचारण करण्यात आले असून या ठिकाणी पुढील आठ दिवस किर्तन महोत्सव पार पडणार आहे. तरी पंचक्रोशीतील भाविक भक्तांनी या कार्यक्रमाला उपस्थित राहून सप्ताहाचा आनंद घ्यावा असे आवाहन सैदापूर ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आले आहे.

## मंडल विजयी दिनानिमित्त प्रकाश आंबेडकर यांचे मंडल स्तंभ स्मारकास अभिवादन

अंबड । प्रतिनिधी

धूळे-सोलापूर राष्ट्रीय महामार्गावरील दोदडगांव ता. अंबड जि. जालना येथे असलेल्या मंडल स्तंभ स्मारकास मा.प्रकाश आंबेडकर यांनी बुधवार दिनांक ७ ऑगस्ट २०२४ रोजी मंडल दिनानिमित्त मंडल स्तंभ स्मारकास सदिच्छा भेट दिली व अभिवादन केले.



यावेळी कार्यकत्याांना मार्गदर्शन करतांना मा. प्रकाश आंबेडकर म्हणाले की, ओबीसी नेत्याांना एकत्र येवुन सत्तेत वाटा मिळवल्याशिवाय ओबीसी आरक्षण टिकवणे शक्य नाही. येत्याा विधानसभा निवडणूकीसाठी मी ओबीसी नेत्यांसोबत चर्चा करणार आहे व जो पक्ष जास्तीत जास्त ओबीसी उमेदवार देईल अशा समविचारी पक्षासोबत युती करण्याच्या विचारात आहे. आजचा हा दिवस प्रत्योक ओबीसीं बांधवासाठी अतिशय महत्वाचा असून हा दिवस प्रत्योकाने विजय दिवस म्हणून साजरा केला पाहीजे. व येत्याा काळात ओबीसीं बाधंवानी एकजुट दाखवून आरक्षण वाचवण्यासाठी लढा दिला पाहीजे असे मतव्यक्त केले.मंडल स्तंभ निर्माते मा.आ.डॉ. नारायणराव मुंढे म्हणाले की, मी प्रथमतः महाराष्ट्रात ओबीसी आरक्षण बचाव यात्रा काढल्याबददल मा.प्रकाश आंबेडकर यांचे मनपूर्वक अभिनंदन करतो. नुकत्यााच पार पडलेल्या लोकसभा निवडणूकीमध्ये कोणत्याही पक्षाने ओबीसींना पाहीजे त्याा प्रमाणात उमेदवारी दिली नाही. तसेच काही मोजक्याच ओबीसींना उमेदवारी दिली परंतू जातीवाद करुन त्यांना पराभूत करण्यात आले. येत्याा विधानसभा निवडणूकीसाठी मा.प्रकाश आंबेडकर यांनी नेतृत्व करावे. ओबीसी त्यांच्या सोबत खंबीरपणे उभा राहील असे मत व्यक्त केले. या कार्यक्रम प्रसंगी मंडल स्तंभ स्मारक समितीचे प्रमुख प्रा. सत्संग मुंढे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक करतांना महाराष्ट्रातील ओबीसींची वज्रमुठ बांधणे आवश्यक असून सर्वच राजकीय पक्षांना ओबीसी एकजुटीची ताकद दाखवल्याशिवाय कोणताही पक्ष ओबीसीची दखल घेणार नाही एकत्र आल्याशिवाय ओबीसीला पर्याय नाही अशी भावना व्यक्त केली. या कार्यक्रमास रेखा ठाकूर, बळीराम खटके, रविंद्र खरात, संतोष राऊत, शरद राठोड, अँड विजय खटके, पांडुरंग बांगर, श्री. सुभाष चाटे, बाबासाहेब बटुळे मामा, डॉ. चाटे, बाळासाहेब दखणे, रणजीत बांगर, सरपंच बंडू मुंढे, सदाशीव गडवे, शहादेव वाघ, दिलीप मुंढे यांच्यासह दोदडगांव पंचकृषीतील वडीगोद्री, नालेवाडी, अंतरवाली सराटी, डोणगांव, रामगव्हाण येथील ओबीसी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सुत्रसंचलन प्रा. लहुराव दरगुडे यांनी केले तर उपस्थितांचे प्रा.डॉ. सोमीनाथ खाडे यांनी मानले.

## आ.प्रकाश सोळंके यांच्यावर बोलताना ईश्वर मुंडेंनी आपली उंची तपासावी

**धारुर । प्रतिनिधी**

गेली तीस ते पस्तीस वर्षाझाली आमदार प्रकाश दादा सोळंके राजकारणात आहेत वीस वर्ष आमदार आहेत त्याांनी काय केले पाहिजे काय बोले पाहिजे हे ग्रामपंचायत निवडणुकीत स्वतःहाच्या आईला निवडणूक न अनु शकलेल्या इश्वर मुंडे यांनी शिकवू नये

प्रसिद्धीसाठी दिलेल्या पत्रकात म्हटले की,आमदार प्रकाश दादा सोळंके गेली तीन ते पस्तीस वर्षे राजकारणात आहेत वीस वर्षे आमदार,माजलगाव मतदार संघात अनेकांना पंचायत समिती सभापती,सदस्य, अनेकांना जिल्हा परिषद सभापती,सदस्य, अनेकांना ग्रामपंचायत सदस्य,सरपंच, अनेकांना बाजार समिती संचालक,सभापती, अनेकांना तालुका अध्यक्ष यासारखी पदे देऊ दादा नी मोठे केले आहे त्याा पैकीच एक इश्वर मुंडे आहेत ज्यांना दादांनी तालुका अध्यक्ष केले तालुक्याच्या राजकारणात मोठे केले पण ते स्वतःहाची ग्रामपंचायत पण निवडून अनु शकले नाही त्यांच्या आईचा ग्रामपंचायत निवडणुकीत पराभव झाला अशा इश्वर मुंडेनी आमदार प्रकाश दादा सोळंके यांच्यावर प्रसिद्धीसाठी टिका करु नये अन्यथा जशास तसे प्रत्युत्तर दिले जाईल असे विश्वास शिनगारे यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात म्हटले आहे



**ग्रामपंचायत निवडणुकीत पराभूत झालेल्या ईश्वर मुंडेंचा प्रसिध्दीसाठी केविलवाणा प्रयत्न : विश्वास शिनगारे**

## महसूल पंधरवाडानिमित्त विविध उपक्रम : मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेबद्दल दिली माहिती

**बीड । प्रतिनिधी**

महसूल पंधरवडा शुभारंभ निमित्ताने मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना शिबिर पट्टीवडगाव ता. अंबाजोगाई येथे आयोजित करण्यात आला असून सदर शिबिरात उपविभागीय अधिकारी अंबाजोगाई दिपक वजाळे, विलास तंरगे तहसिलदार, गटविकास अधिकारी अंबाजोगाई व ग्रामस्थ आदी उपस्थित होते.

मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण उपक्रम संपन्न

महसूल पंधरवडा निमित्ताने मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना या उपक्रमात औद्योगिक प्रशिक्षण संस्था अंबाजोगाई येथे मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेचा लाभ अधिकाधिक विद्यार्थ्यांना घेता यावा यासाठी महसूल विभागामार्फत देण्यात येणाऱ्या प्रमाणपत्राचे शिबिर आयोजित करून प्रमाणपत्रासाठी आवश्यक कागदपत्रांची माहितीपत्रक सर्व विद्यार्थ्यांना देण्यात आले. तसेच विद्यार्थ्यांना सदर योजनेची परिपूर्ण माहिती दिली.

अंबाजोगाई येथे श्री योगेश्वरी महाविद्यालयामध्ये युवकांशी संवाद साधण्यात आला. महसूल विभागामार्फत राबवण्यात येणाऱ्या विविध योजनांचे माहितीपत्रक याप्रसंगी युवकांना वाटण्यात आले. तसेच मतदार नोंदणी बाबत जागृती करण्यात आली.

अंबाजोगाई येथे शेती, पाऊस आणि दाखले उपक्रम राबविण्यात आला.महसूल पंधरवाडा अंतर्गत तहसील कार्यालय अंबाजोगाई येथे




शेती पाऊस आणि दाखले हा उपक्रम राबविण्यात आला.

या नैसर्गिक आपत्तीने बाधित नागरिकांना/पशुपालकांना शासन तरतुदीनुसार देय सानुग्रह अनुदान मंजुरी आदेश वितरीत करण्यात आले. तसेच पुरवठा विभागामार्फत इ रेशन कार्ड वाटप करण्यात आले.

या विशेष मोहिमेमध्ये शासनाने पुर्व मान्सून व मान्सुन कालावधीत अवकाळी पाऊस/अतिवृष्टी/पूर यामुळे बाधित झालेल्या नागरिकांच्या घराचे शेतीचे / फळबागांचे जनावरांचे झालेल्या नुकसानीबाबत, आपत्ती व्यवस्थापन अधिनियम, २००५ मधील तरतुदीनुसार, बाधीत नागरिकांना देय असलेल्या सोई सुविध, नुकसान भरपाई देण्यात आली आहे किवा कसे, याबाबत सर्व कार्यालयीन आढावा घेऊन पात्र नागरिकांना लाभ देण्याबाबतची कार्यवाही करण्यात यावी, असे अपेक्षित असून ते जिल्हयात करण्यात आले आहे.

यासह खरिप हंगामामध्ये घेण्यात येणा-या पिकांचे विमा उतरविण्याकरिता, अर्जदाराच्या मागणीनुसार, पिक पेरा अहवाल, सात बाग व ८-अ असे तलाठी स्तरावरुन देय असलेले विविध दाखले देण्यात आलेले किंवा कसे, याबाबतचा आढावा घेऊन प्रलंबित असलेले दाखले संबंधिताना तात्काळ प्रदान करण्यात यावे असे निर्देश प्राप्त झाले होते. त्याा प्रमाणे जिल्हयातील तालुकांमध्ये उपक्रम राबविण्यात येत आहे.

कृषी मार्गदर्शन कार्यक्रम

महसूल पंधरवडा अंतर्गत कृषी मार्गदर्शन कार्यक्रम मौजे सनगाव तालुका अंबाजोगाई येथे आयोजित करून सदर कार्यक्रमास परभणी कृषी विद्यापीठाचे व्याख्याते श्री सूर्यवंशी यांनी उपस्थित शेतकरी यांना पिकावरील होणाऱ्या रोगराई व त्याावरील उपाय याबाबत मार्गदर्शन केले. तसेच तालुका कृषी अधिकारी अंबाजोगाई यांनी शासनामार्फत शेतकऱ्यांसाठी राबविल्या जाणाऱ्या योजनांची माहिती दिली तसेच उपस्थित आमच्या शेतीविषयक अडचणी विचारून घेऊ त्याबाबत काय उपाययोजना करावी याबाबत चर्चा झाली.

# शेतकऱ्यांना १०० टक्के अनुदानावर बॅटरी ऑपरेटेड फवारणी पंपासाठी मुदतवाढ, कुठे कराल अर्ज?

राज्यात सध्या चांगला पाऊस होत असल्याने राज्यभरातील शेतकऱ्यांनी खरीप पेरण्या उरकून घेतल्या आहेत. कापूस, सोयाबीन क्षेत्रांवर पेरण्या झाल्या असून पिके बहरात आहेत. पिकांवर फवारण्या करण्यासाठी शेतकऱ्यांची लगबग सुरु असून बॅटरीवर चालणाऱ्या फवारणी पंपासाठी शेतकऱ्यांना आता १४ ऑगस्टपर्यंत ऑनलाईन अर्ज करता येणार आहेत.

कापूस, सोयाबीन आणि इतर तेलबीयाआधारित पिकांना चालना देण्यसाठी राज्यसरकार कडून एकात्मिक पिकांची उत्पादकता वाढ व मूल्यसाखळी विकासासाठी विशेष कृती योजना सन २०२४- २५ योजना सुरु आहे. यासाठी सरकारने शेतकऱ्यांना चालु वर्षासाठी बॅटरीवर चालणाऱ्या फवारणी पंपासाठी अर्जमुदत वाढवली आहे.

कुठे व कसा कराल अर्ज?

शेतकऱ्यांनी वेबसाईट वर जाऊन जास्तीत-जास्त ऑनलाईन अर्ज करावेत व योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन कृषी विभागामार्फत करण्यात येत आहे. अधिक माहितीसाठी नजीकच्या जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी / उप विभागीय कृषी अधिकारी / तालुका कृषी अधिकारी कार्यालयाशी



संपर्क साधावा. १०० टक्के अनुदानावर मिळतो बॅटरीवर चालणारा फवारणी पंप

शेतकरी बांधवांना १००% अनुदांनावरती नॅनो युरिया, डीएपी, बॅटरी संचलित फवारणी पंप वितरण करण्यासाठी कृषि विभागाच्या महाडीबीटी पोर्टल द्वारे ऑनलाइन पद्धतीने अर्ज स्वीकारणे सुरू होते. यासाठी ऑनलाइन अर्ज करण्याची मुदत ही ३० जून पर्यंत होती. त्यानंतर दिनांक २४ जुलै रोजी नॅनो युरिया, डीएपी, घटकाची सोडत यादी काढण्यात आली होती.

परंतु बॅटरी संचलित फवारणी पंप साठी अद्याप सोडत यादी काढण्यात आली नाही. तर, फक्त बॅटरी संचलित फवारणी पंप साठी आता कृषी विभागाकडून शेतकर्यांना ऑनलाइन अर्ज करण्यासाठी मुदत वाढ देण्यात आली आहे.

अर्जांची संख्या कमी असल्याने देण्यात आली मुदतवाढ : सन २०२४-२५ मध्ये योजनेंतर्गत चालू खरीप हंगाम मध्ये खालील निविष्ठा १०० % अनुदानावर पुरविण्यात येणार आहेत. मागील १० दिवसापासुन अर्ज करण्याची प्रक्रिया पोर्टलवर सुरू असुन सद्यस्थितीत अर्जांची संख्या खूप कमी प्रमाणात असल्यामुळे दि. १४ ऑगस्ट २०२४ पर्यंत अर्ज करण्यास वाढीव मुदत देण्यात येत आहे. कसा कराल अर्ज? : अर्ज करा बाबीवर क्लिक करणे, कृषि यांत्रिकीकरण - बाबी निवडा यावर क्लिक करणे, मुख्य घटक बाबीवर क्लिक करणे कृषि यंत्र औजारांच्या खरेदीसाठी अर्थसहाय्य, तपशिल बाबीवर क्लिक करून मनुष्यचलीत औजारे घटक निवडणे, यंत्र/औजारे व उपकरणे बाबीवर क्लिक करून पिक संरक्षण औजारे निवडणे , मशीनचा प्रकार बाबीवर क्लिक करून बॅटरी संचलीत फवारणी पंप ( गळीतधान्य)/कापूस निवडणे

## पॉली मल्चिंगचा उपयोग वाढला



शेतकरी केळीसह अन्य भाजीपाला पिकांसाठी पॉली मल्चिंगचा अधिकचा उपयोग करीत आहेत. यातून उत्पादन वाढीसह पाण्याची कटकसर करण्यास बळ मिळत असल्याचे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे. मल्चिंग पेपर व ठिबक सिंचन वापरल्यामुळे शेतकऱ्यांना कमी पाण्यामध्ये चांगले उत्पन्न मिळत आहे. त्याचबरोबर पिकांच्या सोबतीने वाढणाऱ्या तणावरदेखील नियंत्रण राखता येत आहे. त्यामुळे तण काढणीवर होणारा शेतकऱ्यांचा खर्च यामुळे वाचत आहे. पेपरच्या आच्छादनामुळे तापमान आणि आर्द्रता नियंत्रित होत असल्याने पीकवाढीला फायदा होत आहे. त्याचबरोबर किडीचा प्रादुर्भाव होण्यापासून पिकाला वाचविता येत आहे. अतिरिक्त पाऊस झाला तरी त्याचा फारसा परिणाम उत्पादनावर होत नसल्यामुळे मल्चिंगचा वापर अधिक प्रमाणात परिसरातील शेतकरी करू लागले आहेत.

मल्चिंग पेपर आच्छादनासाठी साधारणता ३० ते ३२ हजार रुपये हेक्टरी खर्च येतो. यासाठी शासनाची अनुदान योजनादेखील उपलब्ध आहे. या योजनेतून शेतकऱ्यांना १६ हजार रुपयांपर्यंत हेक्टरी अनुदान मिळते. या योजनेला प्राप्त करून घेण्यासाठी कृषी विभागाशी संपर्क करावा लागतो. त्यामुळे या योजनेत अनेक शेतकरी सहभागीदेखील आहेत.

मल्चिंग पेपरबरोबरच शेतकरी मिरची, कलिंगड, टोमॅटो आदींच्या रोपांवर भर देत आहेत. आधी बियाणे जमिनीत रोवून त्या बियाण्यांच्या माध्यमातून पिकांची उगवण केली जात होती; परंतु आता शेतकरी तयार रोपांची लागवड करत असल्याने पिकांचा कालावधी काहीअंशी कमी होत आहे. रोपांच्या लागवडीतून पिकाची निगा राखणे शेतकऱ्यांना सोपे जात आहे. रोपलागवडीतून मररोगावर नियंत्रण राखता येत आहे. त्याचबरोबर योग्य खते, तसेच विविध कीटकनाशके तसेच पोषक द्रव्यांचा वापर करून अधिक उत्पन्न मिळविता येते आहे. एकंदरीत परिसरातील शेतकरी आधुनिक शेतीकडे वळत आहे.

## उसाला तुरा येणे योग्य की अयोग्य

शेतकरी मित्रांनो उसाला तुरा येणे ही एक नैसर्गिक प्रक्रिया आहे. ऊस पूर्ण परिपक्व झाला की उसाला पुढील पिढी निर्माण करण्यासाठी आणि बीज धारणेसाठी फुलोरा अवस्था येते. उसाचे एक नवीन वान तयार करण्याच्या दृष्टिकोनातून उसाला तुरा येणे ही बाब खूप महत्वाची आहे. परंतु तुम्ही जर फक्त शेतकरी असाल आणि तुमच्या उसावर तुरा हा २ ते ३ महिन्यापासून जास्त काळ असेल तर तुमचे नक्कीच नुकसान होऊ शकते. कारण उसाला तुरा आल्यानंतर कालांतराने ऊसा मधील साखरेचे ग्लुकोज व इतर प्राथमिक पदार्थामध्ये रूपांतन होते. परिणामी आपल्या ऊसाचे वजन कमी भरणे, रिकवरी कमी लग्ने अश्या समस्या येऊ शकतात. त्यामुळे तुम्ही जर फक्त एक ऊस उत्पादक शेतकरी असाल तर तुमच्या उसावर तुरा न आलेलाच बरा.

उसावर तुरा येण्यामागची कारणे : उसाला तुरा येण्याची प्रक्रिया बऱ्याच अंशी ही अनुवंशीक असू शकते. आपण जातीमध्ये पाहिल तर सीओ ७२१९, सीओसी ६७१, सीओ ९४१२ या जातीमध्ये उसाला तुरा लवकर येतो. व सीओ ७४०, सीओ ७१२५, सीओ ८०१४, सीओ २६५ या जातीमध्ये तुरा थोडा उशिरा येतो.

ख) पोषक हवामान : दिवसाचे तापमान २६ ते २८ अंश से, रात्रीचे तापमान २२ ते २३ अंश से., हवेतील आर्द्रता ६५ ते ९० %, दिवसाचा प्रकाश काळ १२.३० तास आणि प्रकाश्याची तीव्रता १० ते १२ हजार फूट कॅंडल अशी अवस्था जर सलग १० ते १५ दिवस राहिली तर उसाला पुढील २ ते



३ महिन्यामध्ये तुरा येण्याची दाट शक्यता असते. सोबतच मातीमधील ओलाव्याचे प्रमाण, पोषणद्रव्यांची उपलब्धता, पानामधील ऑक्सिजन या गोष्टी देखील तुरा येण्यासाठी तितक्याच कारणीभूत असू शकतात. त्यामुळे आपल्याला ऊस पिकामध्ये डिसेंबर ते फेब्रुवारी मध्ये जास्त तुरा आलेला दिसून येतो.

पाण्याचा अतिरेक : पाण्याचा अवाजवी वापर करणे. शेतामध्ये सतत पानी साचून राहणे. जमिनीतून पाण्याचा पुरेसा निचरा न होणे. या गोष्टी मुळे देखील उसाला तुरा येऊ शकतो.

पाण्याचा तान पडणे : खास करून डिसेंबर ते फेब्रुवारी या काळात जर उसाला पाण्याचा तान पडला तर उसाला तुरा येण्याची शक्यता जास्त असते. नत्रयुक्त खतांचा कमतरता जर आपण ऊस पिकाला नत्र युक्त खते जसे की ( युरिया, अमोनिम सल्फेट ) यांच्या मात्रा वेळेवर नाही दिल्या किंवा आपुऱ्य दिल्या तर नक्कीच उसाला तुरा येण्याची शक्यता वाढते. तसे पहिले तर आपल्याला ऊस पिकामध्ये माती परीक्षण करून त्या प्रमाणे खत व्यवस्थापन करणे गरजेचे आहे.

ऊस लागवडीचा प्रकार : लागणी पेक्षा खोडवा उसाला आपल्याला तुरा जास्त आलेला दिसून येतो. तसेच आपण जर एप्रिल किंवा जून मध्ये लागण केळी असेल तर त्यांना तुरा येण्याचे प्रमाण जास्त असते. पण आपण आडसाली लागवड केळी असेल तर तेथे तुम्हाला तुरा थोडा कमी आलेला दिसेल. उसावर तुरा येणे टाळायचे असेल तर काय करावे? उसाचे खत व्यवस्थापन हे नेहमी माती परीक्षण करूनच करावे. उसाला गरजेनुसार मातीच्या मगदुराप्रमाणे पानी द्यावे. त्यासाठी शक्यतो ड्रीप चा वापर करावा. नत्रयुक्त खतांचा पुरेसा पुरवठा करावा. वेळेवर लागवड करावी. लागवडीसाठी तुरा प्रतिकारक जातींची निवड करावी. जास्तीत जास्त सेंद्रिय खतांचा वापर करावा. पाणी निचरा होण्यासाठी योग्य त्या उपाय-योजना कराव्यात. शेतामध्ये पानी साचुन राहू देऊ नये.

## जनावरांतील वंध्यत्व आणि ते कमी करण्याचे उपाय

वंध्यत्व म्हणजे जनावरांची पुनरुत्पादन करण्यास असमर्थता किंवा गर्भधारणा करण्यास असमर्थता. हे वंध्यत्व पूर्णतः किंवा अंशतः असू शकते. मादी पुनःपुनः माजावर येणे हे अंशतः वंध्यात्वाचे प्रमुख लक्षण आहे. याची अनेक कारणे असू शकतात. अयोग्य आहार किंवा आहारात खनिजांची कमतरता हे मुख्य कारण आहे. काही वेळा पूर्ण वंध्यत्व आनुवंशिक कारणांनीसुद्धा होऊ शकते. याकडे आपण दुर्लक्ष करतो. आनुवंशिक तपासणी बरोबर प्रजनन व्यवस्थापन महत्त्वाचे आहे. आहार, व्यवस्थापन, आजारपण वगळता, प्रामुख्याने वंध्यत्वाची इतर काही आनुवंशिक कारणे आहेत.

व्यवस्थापन पद्धती : रेतनाच्या काळात पोषक तत्त्वांच्या अभावामुळे कमकुवत पिढी तयार होते, यामध्ये पुनरुत्पादन क्षमतेचा आभास जाणवतो. जनावरांमधील माज वेळेवर ओळखणे आणि योग्य वेळी रेतन करणे महत्त्वाचे आहे. परिपक्वतेच्या काळात जनावरास खनिज मिश्रण आणि शक्य झाल्यास पेंड खाऊ घालावी. क्वचित नरा बरोबर जुळी जन्मलेली मादी पूर्णतः वंध्यत्व घेऊन जन्मास येते. अशा मादीला फ्रीमार्टिन म्हणतात.

प्रजनन व्यवस्थापन : मोठ्या कळपात निवड प्रक्रियेमुळे आणि छोट्या कळपात इन्ब्रीडिंगमुळे आनुवंशिक बदल होतात. निवड प्रक्रियेमुळे सकारात्मक आणि इन्ब्रीडिंगमुळे नकारात्मक बदल कळपात होतात. इन्ब्रीडिंग म्हणजे जवळच्या नात्यात (जसे नर- संतती, मादी- पुत्र, भावंडं) प्रजनन केल्यामुळे सारखेपणा निर्माण होतो. कळपात इनब्रीडिंग वाढल्यास अप्रगत असलेली जनुके व्यक्त



होतात. अशी जनुके शारीरिक वाढ, पुनरुत्पादन, उत्पादनक्षमता या घटकांवर विपरीत परिणाम करतात. काही पिढ्यांनंतर कळपातील अर्भकांचे वजन वाढण्याची क्षमता कमी होते. जनावरांत अंशतः वंध्यत्व येते. हे टाळण्यासाठी योग्य प्रजनन व्यवस्थापन महत्त्वाचे आहे. नर बदलल्याने कळपातील इन्ब्रीडिंग टळते तसेच नवीन नराची जनुके कळपात येतात. पुढील पिढी अधिक समृद्ध होण्यास मदत होते. गट प्रजनन प्रणालीच्या साहाय्याने नराची अदलाबदल केल्यास इन्ब्रीडिंग टाळता येते. उत्तम परिणाम दिसून येतात. इन्ब्रीडिंग टाळण्यासाठी नात्यात समागम टाळणे ही आवश्यक आहे.

गुणसूत्रांचे दोष : प्रत्येक प्राणिमात्रात गुणसूत्रे असतात. या गुणसूत्रांवर जनुके असतात. यामुळे दुग्ध उत्पादन, मांस उत्पादन, अंडी उत्पादन अवलंबून असते. पेशी विभाजनाच्या वेळी गुणसूत्रे दुप्पट होऊन दोन पेशीत जातात पण क्वचित वियोग न झाल्यास गुणसूत्रांत दोष निर्माण होतात. असे दोष लैंगिक गुणसूत्रांत निर्माण झाल्यास जनावरात वंध्यत्व निर्माण होते. गुणसूत्रांत संरचनात्मक विकृती झाल्याने विसंगती निर्माण होते. सदृश्य निरोगी दिसणारे जनावर सामान्य पुनरुत्पादन करण्यास असक्षम असते. गुणसूत्रांत संरचनात्मक विकृतीचे मुख्यतः चार प्रकार आहेत. गुणसूत्रांचे क्रमपरिवर्तन, गुणसूत्र लोप पावणे, गुणसूत्रांची प्रत बनणे आणि गुणसूत्रांचे स्थानांतर. या चार प्रकारांतील सर्वांत घातक दोष म्हणजे, 'गुणसूत्रांचे स्थानांतर'. गुणसूत्रांचे स्थानांतर झाल्यास जनावराची प्रजनन क्षमता कमी होते. १/२९ रोबर्त्सोनियन स्थानांतर या प्रकारचे नर हे प्रजननक्षम नसतात. ते दोषपूर्ण शुक्राणू पेशी निर्माण करतात. असे नर प्रजननासाठी वापरल्यास मादी मध्ये गर्भपात होतात. जनुकांमध्ये दोष : जनुके ही डीएनएची बनलेली असतात. जर डीएनएमध्ये दोष निर्माण झाले, तर शरीर योग्य प्रमाणात प्रथिने बनवू शकत नाही. काही जनुके प्रजननक्षमतेशी संबंधित असतात. म्हणूनच जनुक दोषांमुळे वंध्यत्व निर्माण होते. प्रजनन व गर्भधारणा घडून येण्यासाठी अनेक संप्रेरकांची आवश्यकता असते. हे संप्रेरक निसर्गतः प्रथिने असतात. इस्ट्रोजन व प्रोजेस्टेरॉन हे मादीमध्ये तर एंड्रोजन हे नर संप्रेरक आहे. जनुकांमधील दोषांमुळे या संप्रेरकांत दोष निर्माण झाल्यास प्रजनन क्षमता कमी होते. नर किंवा मादीमध्ये काही आनुवंशिक दोष असल्यास ते वासरामध्ये वारसाने जातात. यासाठी जनुक दोषांसाठी तपासणी करता येते.कार्यक्षम जनावरांची निवडक करून प्रजनन करावे.




### महत्वाच्या घटना

१५०९ : कृष्णदेव राय हे विजयनगर चे सम्राट बनले.
१६४८ : स्वराज्याची पहिली लढाई पुणे सातारा मार्गावरील खळत-बैलसरच्या लढाईत आदिलशहाचा सरदार फत्तेहखानाच्या फौजेचा शिवाजीराजांनी सपशेल पराभव केला.
१९०८ : विलब राइट यांनी पहिले उड्डाण केले.
१९४२ : भारतीय राष्ट्रीय काँग्रेसने मुंबईतील गोवालिया टँक मैदानावर (ऑगस्ट क्रांति मैदान) झालेल्या अधिवेशनात 'चले जाव' चा ठराव मंजुर केला. याप्रसंगी महात्मा गांधींनी 'करेंगे या मरेंगे' हा संदेश दिला.
१९४९ : भुतानच्या राष्ट्राची स्थापना.
१९६३ : इंग्लंडमधे १५ जणांचा टोळीने रेल्वेवर दरोडा टाकुन २६ लाख पौन्ड पळवले.
१९६७ : इंडोनेशिया, मलेशिया, फिलिपाइन्स, सिंगापूर व थायलँड यांनी ची स्थापना केली.
१९७४ : वॉटरगेट प्रकरण अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष रिचर्ड निक्सन यांनी राजीनामा दिला.
१९८५ : भाभा अणुशक्ती केंद्र तुर्भे येथे 'ध्रुव' ही भारताची सहावी व आतापर्यंतची सर्वात मोठी फास्ट ब्रीडर संशोधनपर अणुभट्टी कार्यान्वित झाली.
१९८८ : म्यानमारच्या राज्यकर्ता ने विनने राजीनामा दिला.
१९९४ : पुणे येथील महर्षी कर्वे स्त्री शिक्षण संस्थेने फक्त महिलांसाठीच असलेले देशातील पहिले वास्तुशास्त्र महाविद्यालय सुरू केले.
१९९८ : संरक्षण संशोधन आणि विकास संस्थेच्या सात प्रयोगशाळा औद्योगिक क्षेत्रासाठी खुल्या झाल्या.
२००० : महाराष्ट्र शासनातर्फे देण्यात येणारा 'महाकवी कालिदास संस्कृत-साधना पुरस्कार' पुण्याचे वेदमूर्ती मोरेश्वर घैसास गुरुजी यांना जाहीर
२००८ : चीनमधील बिंजिंग येथे येथे २९ व्या ऑलिम्पिक स्पर्धांना सुरुवात झाली.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१०७८ : होरिकावा जपानी सम्राट (मृत्यू: ९ ऑगस्ट ११०७)
१८७९ : डॉ. बॉब स्मिथ 'अल्कोहोलिक्स ॲनॉनिमस'चे एक संस्थापक (मृत्यू: १६ नोव्हेंबर १९५०)
१९०२ : पॉल डायरॅक नोबेल पारितोषिक विजेते इंग्लिश भौतिकशास्त्रज्ञ (मृत्यू: २० आक्टोबर १९८४)
१९०८ : संगीत नाटक अकादमी पुरस्कार सन्मानित प्रसिद्ध भारतीय शास्त्रीय संगीत गायिका सिद्धेश्वरी देवी यांचा जन्मदिन.
१९१२ : तुकाराम केरबा ऊर्फ टी. के. अण्णा वडणगेकर कोल्हापूरची कलापरंपरा जपणारे चित्र व शिल्पकलेतील दिग्गज (मृत्यू: ३१ मार्च २००४)
१९१२ : बंगळुरू वेंकट तथा बी. व्ही. रमण जागतिक कीर्तीचे फलज्योतिषी (मृत्यू: २० डिसेंबर १९९८)
१९१५ : पद्मभूषण पुरस्कार, साहित्य अकादमी व संगीत नाटक अकादमी पुरस्कार सन्मानित प्रसिद्ध भारतीय लेखक, नाटककार आणि अभिनेते भीष्म साहनी यांचा जन्मदिन.
१९२५ : डॉ. वि. ग. भिडे शास्त्र व तत्त्वज्ञानाचे अभ्यासक, पुणे विद्यापीठाचे माजी कुलगुरु, केंद्र सरकारचे वैज्ञानिक सल्लागार (१९७३ १९७५), पद्मश्री (मृत्यू: ? जून २००६)
१९२६ : शंकर पाटील साहित्यिक, चित्रपट कथालेखक, ग्रामीण कथालेखक, भारतीय चित्रपट महामंडळाचे संस्थापक सचिव आणि 'बालभारती'चे संपादक. त्यांचे 'चोरा मी वंदिले', 'सागराचे पाणी', 'सवाल', 'बाजिंदा' हे कथासंग्रह तसेच 'सरपंच', 'इशारा', 'घुंगरू', 'कुलवंती', 'बेईमान', 'ललाट रेषा', 'सुन माझी सावित्री' या कादंबर्या हे गाजलेले साहित्य आहे. (मृत्यू: ३० जुलै १९९४)
१९३२ : दादा कोंडके अभिनेते, निर्माते, दिग्दर्शक, संवादलेखक (मृत्यू: १४ मार्च १९९८)
१९३४ : भारतीय अभिनेता, दिग्दर्शक, आणि पटकथालेखक शरत पुजारी यांचा जन्म. (मृत्यू: १२ मे २०१४)
१९४० : दिलीप सरदेसाई क्रिकेटपटू (मृत्यू: २ जुलै २००७)
१९५० : प्लेस्टेशन चे निर्माते केन कुटारगी यांचा जन्म.
१९५२ : भारतीय क्रिकेटपटू सुधाकर राव यांचा जन्म.
१९४८ : भारतीय राजकारणी व राष्ट्रीय काँग्रेस पक्षाचे सदस्य कपिल सिब्बल यांचा जन्मदिन.
१९६८ : भारतीय क्रिकेटपटू आणि प्रशिक्षक ॲबे कुरिविला यांचा जन्म.
१९८१ : रॉजर फेडरर स्विस लॉन टेनिस खेळाडू

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१८२७ : जॉर्ज कॅनिंग ब्रिटनचे पंतप्रधान (जन्म: ११ एप्रिल १७७०)
१८९७ : व्हिक्टर मेयर जर्मन रसायनशास्त्रज्ञ (जन्म: ८ सप्टेंबर १८४८)
१९९८ : डॉ. सुमती क्षेत्रमाडे वैद्यकीय व्यवसाय सांभाळुन साहित्यिक अभिरुची जोपासणार्या लेखिका व कादंबरीकार. त्यांनी 'सीमारेषा', 'अनुहार', 'मेघमल्हार', 'वृंदा', 'युगंधरा', 'महाश्वेता' आदी चौदा कादंबर्या दोन नाटके व काही कथा लिहिल्या. (जन्म: ? ? १९१५)
१९९९ : गजानन नरहर सरपोतदार चित्रपट निर्माते व दिग्दर्शक (जन्म:)
२००० : भारतातील कर्नाटक इथील एकीकरण चळवळीत महत्वाची भूमिका बजावणारे कर्नाटकचे ज्येष्ठ राजकारणी आणि माजी मुख्यमंत्री एस. निजलिंगप्पा यांचे निधन.

# औद्योगिक वसाहत निर्मितीच्या मार्गावर अंबाजोगाईची वाटचाल सुरु

## प्रकल्प जमिनीच्या समतल सर्वेक्षण आणि सिमांकनासाठी निघाली निविदा

अंबाजोगाई । प्रतिनिधी

अंबाजोगाईकरांसाठी बहुप्रतीक्षित आणि शहर विकासाच्या दृष्टीने अत्यंत महत्वपूर्ण असलेल्या शासकीय औद्योगिक वसाहत (एमआयडीसी) निर्मितीच्या दृष्टीने आ. नमिता मुंदडा यांच्या आग्रही पाठपुराव्यानंतर शासन पातळीवर वेगाने हालचाली सुरु आहेत. लवकरच अंबाजोगाई 'एमआयडीसी'साठी काळवटी तांडा परिसरात समतल सर्वेक्षण आणि सिमांकन करण्यात येणार असून या कामाची निविदा देखील प्रकाशित झाली आहे.

अंबाजोगाई शहराचा विकास झपाट्याने होत असल्याने व या ठिकाणी बहुतांश जिल्हास्तरीय सर्व कार्यालय कार्यरत आहेत. या ठिकाणी सहकारी साखर कारखाना, सुतगिरण्या, कृषी उत्पादनावर आधारीत प्रक्रिया उद्योग, सहकारी बँका, पतसंस्था, आरोग्य विषयक सुविधा, कुशल मनुष्यबळ उपलब्ध आहे. त्याच प्रमाणे शहरापासून लातूर येथील विमानतळ जवळ असून परळी, घाटनांदुर, लातूर येथील रेल्वे स्टेशनही जवळच आहेत. त्यामुळे औद्योगिक क्षेत्रातील गुंतवणुकदारांच्या दृष्टीने अंबाजोगाई हे शहर सोयीचे आहे. शहरालगत मोठ्या प्रमाणावर गायरान, मोकळ्या जागा उपलब्ध आहेत. त्यामुळे या ठिकाणी एमआयडीसी प्रकल्प उभारणे अत्यंत आवश्यक आहे. या प्रकल्पामुळे या भागातील सुशिक्षीत, बेरोजगारांच्या हाताला रोजगार मिळवून उद्योजकांना मोठ्या प्रमाणात चालना मिळेल. व अंबाजोगाई येथे तातडीने एमआयडीसी व्हावी यासाठी आ.नमिता मुंदडा पुढाकार घेत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, प्रधान सचिव उद्योग विभाग यांच्याकडे एमआयडीसी अंतर्गत अंबाजोगाई येथे औद्योगिक क्षेत्र स्थापन करण्यासाठी मंजूरी द्यावी अशी विनंती केली होती. तसेच, या बाबत आ. मुंदडा यांनी महाराष्ट्र शासनाचे अवर सचिव, भूसंपादन विभागाचे महाव्यवस्थापक आणि व्यवस्थापक तसेच महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांच्याकडे सातत्याने पाठपुरावाही केला होता. अखेर त्यांच्या प्रयत्नाला यश आले आणि काळवटी तांडा परिसरातील जागा 'एमआयडीसी'साठी निश्चित करण्यात आली. हा भाग डोंगराळ असल्याने याचे समतल सर्वेक्षण करून सिमांकन करण्यासाठी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून निविदा देखील प्रसिद्ध करण्यात आली आहे. ही प्रक्रिया अंबाजोगाई 'एमआयडीसी' निर्मितीतील महत्वाचा टप्पा असणार आहे. यानिमित्ताने शैक्षणिक आणि सांस्कृतिक क्षेत्रात अग्रेसर असणाऱ्या अंबाजोगाई शहर औद्योगिक शहर बनण्याच्या दृष्टीने वाटचाल सुरु केली आहे. एमआयडीसी मुळे या भागातील बेरोजगारांना रोजगार मिळेल व उद्योजकांना चालना मिळेल अशी अपेक्षा व्यक्ती करून आ.नमिता मुंदडा यांनी या बाबत राज्याचे मुख्यमंत्री एकनाथराव शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, उद्योगमंत्री उदय सामंत, आ. पंकजाताई मुंडे, भाजप नेत्या डॉ.प्रितमताई मुंडे यांचे आभार मानले आहेत.



### स्व.डॉ. विमलताई मुंदडा यांनीही केला होता प्रयत्न

अंबाजोगाईत एमआयडीसी व्हावी म्हणून दिवंगत मंत्री स्व.डॉ.विमलताई मुंदडा यांनी सन २००४ मध्ये वरवटी येथे पंचतारांकित एमआयडीसी मंजूर केली होती. त्यासाठी गायरान व शेतकर्यांची जमीन संपादन करणे आवश्यक होते. परंतु, शेतकर्यांनी विरोध केल्याने सदर प्रकल्पासाठी जागा उपलब्ध झाली नाही. त्यांचे अपूर्ण स्वप्न आत त्यांच्या स्नुषा आ.. नमिता यांच्या माध्यमातून पूर्ण होण्याची चिन्हे आहेत.

## शेतकऱ्याला उध्वस्त करणाऱ्या सरकारला जाब विचारा-भाई गोले पाटील



माजलगाव । प्रतिनिधी

गेल्या दहा वर्षात शेतकरी पूर्णता नागवला असताना शासन शेतकऱ्याचे कर्जमाफी करू शकलेले नाही तसेच २०२० व २३-२४ सालचा पिक विमा अद्याप शेतकऱ्यांच्या खात्यात जमा झालेला नाही, सर्वात महत्त्वाचा आणि जिव्हाळ्याचा म्हणजे शेतकऱ्याच्या शेतमालाला किपायात शिर हमीभावाचा प्रश्न अनेक दशकापासून प्रलंबित असून त्याकडे राज्यकर्त्याचे जाणीवपूर्वक दुर्लक्ष होत असून शेतकऱ्याला उध्वस्त करणाऱ्या सरकारला जॉब विचारण्यासाठी ०९ ऑगस्ट रोजी उपविभागीय कार्यालयासमोर होत असलेल्या धरणे आंदोलनात सहभागी व्हा असे आवाहन शेतकरी कामगार पक्षाचे नेते शेतकरी कामगार पक्षाचे राज्य मध्यवर्ती समिती सदस्य भाई अॅड नारायण गोले पाटील यांनी मंगरूळ नं.१ सावरगाव, फुले पिंपळगाव, हरकी निमगाव येथे शेतकऱ्यांशी संवाद साधताना केले.

शेतकरी कामगार पक्षाच्या वतीने माजलगाव मतदार संघात शेतकरी संवाद दौरा सुरू असुन या मध्ये शेतकऱ्यांची सरसकट कर्जमाफी झालीच पाहिजे, पिक विमा शेतकऱ्यांना तात्काळ मिळालाच पाहिजे, उसाचे गेल्या दोन वर्षाचे राहिलेले पैसे तात्काळ शेतकऱ्यांचा खात्यात जमा झाले पाहीजे.. पि एम किसान यौजने पासुन वंचित शेतकर्यांचा सदर यौजनेत तत्काळ समावेश केला पाहीजे..शेतमालाला उत्पादन खर्चावर आधारीत हमी भाव दिला पाहिजे.बि-बियाणांच्या व खतांच्या वाढत्या किमती तात्काळ कमी झाले पाहिजे..माजलगाव तालुक्यातील सर्वच पांदन रस्त्याचे मुरुम-खडीकरण झाले पाहिजे.. लोकनेते कारखान्याने शेवटच्या ११दिवसाच्या काळातील गाळप केलेल्या ऊसाचे बिल तात्काळ अदा झाले पाहिजे सह अनेक प्रश्नांसाठी शेतकरी कामगार पक्षाच्या राज्य मध्यवर्ती समितीचे सदस्य भाई अॅड.नारायण गोले पाटिल, यांनी दि.०५ऑगस्ट रोजी सावरगाव,फुले पिंपळगाव,हरकी निमगाव,मंगरुळ नंबर १ येथे शेतकऱ्याला उध्वस्त करणाऱ्या सरकारला जॉब विचारण्यासाठी ०९ ऑगस्ट रोजी उपविभागीय कार्यालयासमोर होत असलेल्या धरणे आंदोलनात सहभागी व्हा असे आवाहन शेतकरी कामगार पक्षाचे नेते, शेतकरी कामगार पक्षाचे राज्य मध्यवर्ती समिती सदस्य भाई अॅड नारायण गोले पाटील यांनी मंगरूळ नं.१ सावरगाव, फुले पिंपळगाव, हरकी निमगाव येथे शेतकऱ्यांशी संवाद साधताना केले.

## अंबाजोगाई रोटरी क्लबला मिळाली आठ पारितोषिके

### परिवर्तन ग्राम व दिव्यांग बांधवांसाठी राबविलेल्या उपक्रमांची दखल

अंबाजोगाई । प्रतिनिधी

रोटरी क्लब ऑफ अंबाजोगाई सिटीने गेल्या वर्षभरात परिवर्तन ग्राम, दिव्यांग व्यक्तींना हात, पाय व कृत्रिम अवयवांचे वाटप, यासह विविध सामाजिक उपक्रम राबविले.याची दखल घेऊन अंबाजोगाई क्लब ला विविध उपक्रमांची आठ पारितोषिके देऊन सन्मानित करण्यात आले.





रोटरी क्लबचा वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ पांचगणी येथे झाला. या कार्यक्रमात रोटरी क्लब ऑफ अंबाजोगाई सिटी ला एकूण ८ पुरस्कार मिळाले. ९० क्लब चा ३१३२ हा जिल्हा आहे. यात सर्वोकृष्ट क्लब म्हणून द्वितीय क्रमांकाचे पारितोषक मिळाले.तर २५ गोदान प्रकल्पासाठी विशेष पुरस्कार प्राप्त झाला. परिवर्तन ग्राम अंतर्गत ग्रामीण भागातील कामासाठी विशेष पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. पोलिओ फंडात जमा केलेल्या मदतनिधी साठी तसेच आणि जयपूर फुट शिबीर या सर्व कामासाठी तृतीय पुरस्कार मिळाला. सदस्य संख्या वाढीसाठी रजत पुरस्कार, जागतिक रोटरी चा क्लब उत्कृष्टता पुरस्कार, आणि सहाय्यक प्रांतपाल डॉ निशिकांत पाचेगावकर यांना त्यांच्या रोटरी सेवेसाठी सन्मानित करण्यात आले. रोटरी क्लब चे माजी अध्यक्ष स्वप्नील परदेशी, सचिव गणेश राऊत, अध्यक्ष कल्याण काळे, सचिव धनराज सोळंकी, क्लब प्रशिक्षक प्रा.संतोष मोहिते, अजित देशमुख,प्रा.रोहिणी पाठक, डॉ. अनिल केंद्रे, प्रदीप झरकर, आनंद कर्णावट, गोपाळ पारीख,राम सारडा, यांची यावेळी उपस्थिती होती. रोटरीचे माजी अध्यक्ष स्वप्नील परदेशी,सचिव गणेश राऊत व टीम ने वर्षभर केलेल्या कामाची दखल घेऊन हा सन्मान अंबाजोगाई शहराला मिळाला. त्या बद्दल त्यांचे सर्वत्र स्वागत होत आहे.

## लाडकी बहीणसह गरीब कुटुंबांना मिळणार ३ गॅस सिलेंडर मोफत-अप्पर जिल्हाधिकारी मेत्रेवार

जालना । प्रतिनिधी

राज्यातील गरीब कुटुंबांना वार्षिक तीन गॅस सिलेंडर मोफत देण्यासाठी मुख्यमंत्री अन्नपुर्णा योजना राज्य शासनाने जाहिर केली आहे. या योजनेची अंमलबजावणी करण्याच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांच्या सुचनेनुसार मंगळवारी (दि.६) अपर जिल्हाधिकारी रिता मेत्रेवार यांच्या अध्यक्षतेखाली बैठक संपन्न झाली. या योजनेची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याबरोबरच योजनेपासून कोणीही पात्र लाभार्थी वंचित राहणार नाही, याची दक्षता संबंधीतांनी घेण्याची सूचना श्रीमती मेत्रेवार यांनी केली.




बैठकीस जिल्हा पुरवठा अधिकारी सविता चौधर, सहा. जिल्हा पुरवठा अधिकारी श्री. डी.एस. दिवटे, ऑईल कंपन्यांचे सेल्स ऑफिसर, गॅस एजन्सीचे प्रतिनिधी व तहसील कार्यालयांचे कर्मचारी उपस्थित होते. मुख्यमंत्री अन्नपुर्णा योजनेअंतर्गत पात्र लाभार्थ्यांना वार्षिक तीन मोफत गॅस सिलेंडरचे पुनर्भरण तेल कंपन्यांमार्फत उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. लाभार्थ्यांची पात्रता- या योजनेतंर्गत जिल्ह्यातील उज्वला योजनेचे लाभार्थी तसेच मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या पात्र लाभार्थ्यांच्या कुटुंबाला वार्षिक ३ गॅस सिलेंडरचे पुनर्भरण (रिफिल) मोफत उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. एका कुटुंबात (रेशन कार्डनुसार) केवळ एक लाभार्थी सदर योजनेस पात्र असेल. सदर लाभ केवळ १४.२ कि.ग्रॅ. वजनाच्या गॅस सिलेंडरची जोडणी असलेल्या गॅसधारकांना अनुज्ञेय राहील. कार्यपध्दती -सदर योजनेची सबसीडी लाभार्थ्यांच्या बँक खात्यामध्ये थेट लाभ हस्तांतरणाद्वारे द्वारे जमा करण्यात येणार असल्यामुळे ई-केवायसी करणे आवश्यक आहे, असे जिल्हा पुरवठा अधिकारी श्रीमती चौधर यांनी कळविले आहे.

## निळ्या ध्वजाचे ध्वजारोहन करून अण्णाभाऊ साठे यांना अभिवादन

माजलगांव । प्रतिनिधी

येथील डॉ बाबासाहेब आंबेडकर चौक या ठिकाणी निळ्या ध्वजाचे ध्वजारोहन व साहित्यरत्न साहित्यसम्राट अण्णाभाऊ साठे यांच्या १०४ वा जयंती निमित्त भव्यदिव्य असे अभिवादन करण्यात आले.या वेळी निळ्याध्वजाचे ध्वजारोहन संजिवनी हॉस्पीटलचे संचालक डॉ. ज्ञानेश्वर गिलबीले यांच्या हस्ते करण्यात आले.या वेळी उपस्थीत बाबूराव पोटभरे, दयानंद स्वामी, प्रा.डॉ.मिलिंद अवाड, नारायण डक, राजेश घोडे, भाई गंगाभिषण थावरे, नितिनराव नाईकनवरे, नासेर पठाण, रामशेठ राठोड, नवनाथ धाईजे, अभय होके, डॉ दिनकर मस्के, सूशिल डक, धमानंद साळवे, अमोल डोंगरे, रशिद शेख, अनिकेत डक,



गोविंद टाकणखार, गोपाळ पैंजणे, सूभाष नाकलगावकर,अमर साळवे, शंतूनू सोळंके, शिवाजी सूतार, रामराजे रांजवण, नारायण होके, मनोज फरके, आरेफ खान मोशिन बागवान नगरपरिषदेचे सर्वच कर्मचारी बांधव व विवध मान्यवरांनी समयोचीत अण्णाभाऊ साठे यांच्या जयंती निमित्त अभिवादन करूण शूभेच्छा दिल्या या आगळ्यावेगळ्या अभिवादना वेळी मित्रपरिवार व समाजबांधव मोठ्या प्रमाणात होते.या कार्यक्रमाचे आयोजन जयंती उत्सव कमिटीचे सर्वच सदस्य अशोक ढगे, विजय सोनवने, सौरव कांबळे, राजू बडवणे, हनूमान कांबळे, बंडू उपाडे बाळासाहेब ढगे, संदिप भिसे, यादा कांबळे, राणू मिसाळ, बाबा कांबळे, मल्हारी ढगे, अलिशेर कूरेशी, सूरेश तूपसौंदर, अर्जून भिसे, सूनिल भिसे, बाळू साळवे, तोडके यांनी केले होते

## बीडमध्ये वीरशैव स्मशानभूमीत २ खोल्यांच्या बांधकामाचे भूमिपूजन

### डॉ.योगेश क्षीरसागर यांनी निधी उपलब्ध करून दिल्याने अनेक वर्षांचा प्रश्न मार्गी

बीड । प्रतिनिधी

शहरातील वीरशैव समाजाच्या स्मशानभूमीमध्ये दोन खोल्यांच्या बांधकामाचे भूमिपूजन राष्ट्रवादी कॉंग्रेसचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांच्या हस्ते मंगळवारी (दि.६) दुपारी ३ वाजता करण्यात आले. स्मशानभूमीमध्ये खोल्या उभारण्याची समाजाची मागणी होती. यासंदर्भात समाजाच्या शिष्टमंडळाने डॉ.क्षीरसागर यांची भेट घेऊन निधीची मागणी केली होती. क्षीरसागरांनीही समाजभावनेचा आदर करुन खोली बांधकामासाठी तत्काळ १० लाखांचा निधी उपलब्ध करुन दिला आणि प्रत्यक्ष कामाला सुरुवात झाली.

शहरातील कंकालेश्वर मंदिराच्या मागील बाजूस वीरशैव लिंगायत समाजाची स्मशानभूमी आहे. स्मशानभूमीत अंतर्गत रस्ते, पाण्याची सुविधा, निवारा नसल्याने



अंत्यविधीस येणाऱ्या नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागतो. पावसाळ्यात तर मोठे हाल होतात. केवळ स्मशानभूमीला कंपाऊंचे काम झालेले आहे. भौतिक सुविधांसोबतच स्मशानभूमीत दोन खोल्या उभारणे गरजेचे आहे. यामुळे वीरशैव लिंगायत वाणी समाजाचे अध्यक्ष रामेश्वरअप्पा कानडे यांच्या नेतृत्वाखाली शिष्टमंडळाने राष्ट्रवादी कॉंग्रेसचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांची भेट घेऊन स्मशानभूमीतील दुरवस्थेबाबत माहिती दिली. तसेच, दोन खोल्यांचे बांधकाम करण्याची मागणी केली होती. त्यानुसार डॉ.क्षीरसागर यांनी तत्काळ वीरशैव स्मशानभूमीत दोन खोल्यांचे बांधकाम सुरू करण्याचे नियोजन केले. या कामाचे भूमिपूजन त्यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी वीरशैव लिंगायत वाणी समाजाचे अध्यक्ष रामेश्वरअप्पा कानडे, अशोक चिपाडे, शिवाप्पा भुरे, अशोक शहागडकर, बाळूशेट मिटकरी, अनिल मिटकरी, उत्तरेश्वर कानडे, नागेश मिटकरी, पशुपती मिटकरी, दिनेश राजमाने, अमर ढेपे, अनंत शहागडकर, अमोल होनराव, अमोल गलधर, ज्ञानेश्वर राऊत, साजेद जागीरदार, भारत शेटे, सुरेश कानडे, दिनेश राजमाने, शुभम कुलथे, दिलीप ढेपे, चंदू विभुते, अनंत शहागडकर, महारुद्र घेवारे, महेश डोंगरे, श्रीकृष्ण पताळे, सोमनाथ कानडे, सचिन रेगुडे, रवींद्र कानडे, बाळू स्वामी, योगेश बारस्कर, अमित कानडे, विद्याभूषण बेदरकर आदी उपस्थित होते.

## गुत्तेदारांच्या हलगर्जीपणामुळे बसस्थानकातील स्वच्छालयाच्या कामाला विलंब

धारूर। प्रतिनिधी

धारूरबसस्थानकामध्ये नागरिकांची शौच्याचि व्यवस्था व्हावी म्हणून परिवहन महामंडळाच्या वतीने निधी उपलब्ध करून दुर्गेश मोहनप्रसाद दुबे या ठेकेदाराला दि.०२/०१/२०२३ रोजी कार्यकारी अभियंता रा.प. औरंगाबाद -२ यांनी काम करण्यासंदर्भात कार्यारंभ आदेश दिले होते या आदेशात ९० दिवसात काम पूर्ण करण्याची अट घालण्यात आलेली होती मात्र एक वर्ष सात महिने उलटूनही ठेकेदाराच्या हलगर्जीपणामुळे शौचालयाच्या कामाला विलंब झाल्याचे दिसून येत असल्याने संबंध ठेकेदारावर विभागीय अभियंता रा.प. बीड हे करारनामेप्रमाणे कार्यवाही करणार आहेत का असा प्रश्न या अनुषंगाने उपस्थित होत आहे.



धारूर येथीलबसस्थानकामध्ये बाहेरगावाहून येणाऱ्या व येथील प्रवाशांची शौच्याचि गैरसोय दूर व्हावी म्हणून परिवहन महामंडळाच्या वतीने लाखो रुपयेचा शौच्यालयाच्या बांधकामासाठी निधी देण्यात आला या निधीतून दि.०२/०१/२०२४ रोजी दुर्गेश मोहनप्रसाद दुबे या ठेकेदाराला कार्यकारी अभियंता रा.प. औरंगाबाद -२ यांनी ९० दिवसाच्या आत काम करण्याच्या अटीवरून कार्यारंभ आदेश दिले होते मात्र मागील काळामध्ये विभागीय अभियंता रा.प. बीड आणि ठेकेदार यांच्यात झालेल्या करारनामेप्रमाणे संबंधित ठेकेदाराकडून स्वच्छालयाचे काम होत नसल्याने संबंधित ठेकेदाराला वेळोवेळी तब्बल सहा वेळेस पत्रव्यवहार करून सदरील काम संत गतीने सुरू असल्याचे सांगण्यात आले होते तसेच सदर काम लवकरात लवकर पूर्ण करण्याच्या दृष्टीने कोणतीही कार्यवाही संबंधित ठेकेदाराकडून होत नसल्याचे दिसून आल्याने दि.२४ एप्रिल २०२४ रोजी विभागीय अभियंता रा. प बीड यांनी संबंधित ठेकेदाराला शेवटचे पत्र देऊन माहे जून २०२४ काम पूर्ण करण्यात यावे अन्यथा तुमच्यावर ब १ करारानुसार कारवाई करण्यात येईल व आपले नाव काळ्या यादीत टाकणे बाबत वरिष्ठाकडे अहवाल पाठवण्यात येईल असा इशारा देऊनही संबंधित ठेकेदाराकडून पहिल्या पत्राप्रमाणे शेवटच्या ११ ला देखील काडीमोल किंमत देऊन कामाकडे दुर्लक्ष करत काम प्रलंबित ठेवले त्यामुळे दिलेल्या मर्यादेत शौचालयाचे काम पूर्ण करण्यात आलेले नाही त्यामुळे संबंधित ठेकेदार किती मुजोर आहे हे स्पष्ट दिसून येत असल्याने संबंधित ठेकेदारावर कारवाई करण्याची मागणी होत असून या संदर्भात वरिष्ठांना निवेदनही देण्यात आले आहे त्यामुळे संबंधित ठेकेदारावर विभागीय अभियंता रा.प बीड हे करारनाम्याप्रमाणे कारवाई करतात हे पाहणे गरजेचे आहे.

## निराधारांच्या अनुदानासाठी थाळीनाद मोर्चा काढणार : थावरे

माजलगाव । प्रतिनिधी

माजलगाव मतदारसंघातील निराधारांना चार महिन्यांपासून अनुदान मिळालेले नाही. यामुळे त्याच्यावर उपासमारीची वेळ आली असून निराधारांच्या अनुदानासाठी १४ ऑगस्ट रोजी माजलगाव तहसीलवर थाळीनाद मोर्चा काढून तहसील बंद करण्याचा इशारा संजय गांधी, श्रावण बाळ निराधार संघटनेचे अध्यक्ष भाई गंगाभिषण थावरे यांनी दिला आहे.

थावरे म्हणाले की, गरिबी हटवण्यासाठी, तळागाळातील गरीब लोकांसाठी असलेल्या योजनांची जाहिरातबाजी केली जात असली तरी लाभार्थी मात्र प्रत्यक्ष लाभापासून वंचित आहेत. माजलगाव, वडवणी, धारुर तालुक्यात केंद्र आणि राज्य सरकारच्या संजय गांधी निराधार, इंदिरा गांधी निराधार, वृद्धापकाळ, श्रावणबाळ, वृद्ध, अपंग, दिव्यांग, अविवाहित महिला, विधवा, घटस्फोटित, परित्यक्ता, कुष्ठरोगी, निराधार, अशा दारिद्र रेषेखालील लाभार्थ्यांचे अनुदान चार महिन्यांपासून त्यांच्या बँक खात्यावर जमा झालेले नाही. यामुळे त्यांच्यावर उपासमारीची वेळ आली आहे. समाजातील दीनदुबळे, मागासवर्गीय, विमुक्त आणि भटक्या जाती, जमाती, इतर मागासवर्गीय, तसेच वृद्ध, अपंग, दिव्यांग, अविवाहित, क्षयरोगी, घटस्फोटीत, परित्यक्ता, कुष्ठरोगी, एड्सग्रस्त व्यक्तींना केंद्र आणि राज्य सरकारकडून दरमहा अर्थसहाय्य दिले जात होते. मात्र लाभार्थ्यांच्या खात्यावर चार महिन्यापासून अनुदानच जमा झाले नाही.

निराधारांचे अनुदान त्यांच्या बँक खात्यावर जमा झाले नाही तर मतदारसंघातील निराधारांना घेऊन १४ऑगस्ट रोजी माजलगाव तहसीलवर थाळीनाद मोर्चा काढून तहसील बंद करण्याचा इशारा संजय गांधी, श्रावण बाळ निराधार संघटनेचे अध्यक्ष भाई गंगाभिषण थावरे यांनी दिला आहे.

# दोषींवर फौजदारी गुन्हे दाखल करा

## मागणीसाठी सभासदांचे सहाय्यक निबंधक कार्यालयासमोर आमरण उपोषण

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

येथील स्वामी विवेकानंद शिक्षक सहकारी पतसंस्था मर्यादित अंबाजोगाई / परळी या संस्थेतील आर्थिक अनियमितता प्रकरणी दोषींवर फौजदारी स्वरूपाचे गुन्हे दाखल करण्यात यावेत या मागणीसाठी संस्थेची माजी चेअरमन, संचालक व सभासदांनी सोमवार, दिनांक ५ ऑगस्ट २०२४ पासून सहाय्यक निबंधक कार्यालय, अंबाजोगाई येथे आमरण उपोषण सुरू केले असल्याची माहिती माजी संचालक व सभासदांनी मंगळवार रोजी आयोजित पत्रकार परिषदेतून दिली आहे.

याप्रकरणी आयोजित पत्रकार परिषदेत बोलताना माजी चेअरमन भगवान महिपती दराडे यांनी सांगितले की, माझ्यासह इतर सात जण ज्यात माजी संचालक आणि सभासद यांचा समावेश आहे. आम्ही रविवार रोजी पासून स्वामी विवेकानंद शिक्षक सहकारी पतसंस्था मर्यादा अंबाजोगाई / परळी आमरण उपोषणाला बसलो आहोत. पुढे हे आंदोलन साखळी पद्धतीने सुरू राहणार आहे. आमच्या आंदोलनस्थळी ज्येष्ठ नेते ॲड.अनंतराव जगतकर यांनी भेट दिली आहे. आमचा प्रश्न समजून घेत याप्रकरणी तात्काळ योग्य ती कार्यवाही करावी याबाबत प्रशासनातील वरिष्ठ अधिकारी यांच्याशी त्याांचे बोलणे झाले आहे. अधिक माहिती देताना माजी चेअरमन दराडे यांनी सांगितले की, स्वामी विवेकानंद शिक्षक सहकारी पतसंस्था मर्यादा अंबाजोगाई / परळीचे सन २०१२ ते २०१७ या कालावधीचे फेरलेखापरीक्षण सतीश काकासाहेब पोकळे (विशेष लेखा परीक्षक वर्ग-२ फिरते पथक, बीड) यांनी १५ सप्टेंबर २०२३ रोजी पूर्ण करून अहवाल त्याांचा दाखल केला होता. त्याा अहवालानुसार या पतसंस्थेत ४ कोटी ८३ लाख ६० हजार ७४१ रूपयांचा अपहार झाल्याचे निष्पन्न होऊन या अपहाराची जबाबदारी संस्थेचे तत्कालीन अध्यक्ष दादासाहेब पवार, उपाध्यक्ष गिरीधर देशमुख, सूर्यकांत धायगुडे, शिवहार भताने, मानद सचिव अंगद घुले व शर्मा गायकवाड व संचालक सुनील धपाटे, व्यंकटेश गायकवाड, गंगाधर केलूरकर, सुनील म्हेत्रे, श्रीमती प्रभावती अवचर, आशालता बोळे नानजकर, हरिश्चंद्र चाटे, पांडुरंग पांडे तसेच संस्थेचे तत्कालीन कर्मचारी, डीसीसी बँक शाखा अंबाजोगाईचे शाखा अधिकारी बालासाहेब पौळ, रोखपाल संजय साळवे यांच्यासह इतर यांच्यावर निश्चित करून आपहारास दोषी धरण्यात आले. सतीश पोकळे (विशेष लेखापरीक्षक) यांनी संस्थेतील या अनियमितता प्रकरणी संस्थेचे तत्कालीन पदाधिकारी व संचालक, कर्मचारी यांच्यावर दिनांक ०४/११/२०२३ रोजी पोलीस स्टेशन,अंबाजोगाई येथे फिर्याद देऊन गुन्हा नोंद करणे बाबत कळविले.



स्वामी विवेकानंद शिक्षक सहकारी पतसंस्थेत विशेष लेखा परीक्षकांना आढळली आर्थिक अनियमितता ; पत्रकार परिषदेत माजी संचालकांची माहिती

परंतु, वेळीच गुन्हा नोंद न झाल्याने दोषी संचालकांनी सहकार मंत्रालय, नागपूर येथे स्थगिती आदेशासाठी प्रकरण दाखल करून दिनांक २०/१२/२०२३ रोजी स्थगिती आदेश मिळवला. तो स्थगिती आदेश माननीय अपर मुख्य सचिव, मंत्रालय मुंबई यांनी दिनांक १८ जुलै २०२४ रोजी उठवण्यात येऊनही झाला नाही. तसेच या संस्थेचे सन २००० ते २०१२ या कालावधीचे चाचणी लेखापरीक्षण सतीश पोकळे (विशेष लेखा परीक्षक वर्ग-२ फिरते पथक, बीड) यांनी केले असून या चाचणी लेखापरीक्षणात रूपये दोन कोटी १८ लाख २९ हजार ४६९ रूपयांचा अपहार झाला असल्याचे निष्पन्न होऊन संस्थेच्या पदाधिकारी व संचालकांना दिनांक २०/०५/२०२४ ला नोटिसा देऊन त्याांचे म्हणणे सादर करणेबाबत कळवले. तरी परंतु, त्याा पुढील कार्यवाही अद्यापपर्यंत झालेली नाही. सन २००० ते २०१७ कालावधीत एकूण ७ कोटी १ लाख १९ हजार २१० रूपयांचा अपहार झालेला असून तो संपूर्णतः संगणमताने संबंधितांचा आर्थिक स्वार्थ साधण्यासाठी केलेला आहे. या अपहारास लेखापरीक्षणानुसार जबाबदार असणाऱ्या संस्थेच्या तत्कालीन पदाधिकारी व संचालकांसह कर्मचारी व डीसीसी बँक शाखा अंबाजोगाईचे तत्कालीन शाखा अधिकारी व कर्मचारी यांच्यावर तात्काळ फौजदारी गुन्हे दाखल करून पुढील कारवाई करा याबाबत दिनांक ५ ऑगस्ट २०२४ पासून सहाय्यक निबंधक कार्यालयासमोर उपोषण आमरण उपोषण सुरू केले आहे. त्याास प्रशासनाने न्याय द्यावा व संस्थेचे आर्थिक नुकसान भरून काढून सभासदांचे भाग परत करावेत. या मागणीसाठी माजी चेअरमन भगवान दराडे, भगवान गडदे, संजीव उमाप, विनायक चव्हाण, सर्जेराव काशिद, वैजनाथ आंबाड, श्रीमती शैला गणपतराव जाधव व श्रीमती रेखा चंद्रकांतराव टाक या आठ माजी चेअरमन, संचालक व सभासदांनी अमरण उपोषण सुरू केले आहे. या आंदोलनाला स्वामी विवेकानंद शिक्षक सहकारी पतसंस्था मर्या.अंबाजोगाई / परळीच्या सभासद बांधवांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.

## ३ लाख ५२ हजार ८८० लाभार्थ्यांनी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेमध्ये जिल्हयातून अर्ज दाखल

**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यामध्ये आतापर्यंत ३ लाख ५२ हजार ८८० महिलांनी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण या योजनेमध्ये अर्ज दाखल केले असून ९४.३४ % टक्के अर्जांची छाननी करून मोबाईलव्दारे स्वीकृती संदेश देण्यात आले आहेत.

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेमध्ये लाभार्थी महिलांची नोंदणी आणि अर्जाची पडताळणी करण्याची विशेष मोहीम जिल्हयात सुरू असून याअंतर्गत ३ लाख ५२ हजार ८८० महिलांनी दाखल केलेल्या अर्जाची छाननी करून ३,३२,८९२ लाभार्थी महिलांच्या अर्जांना स्वीकृती देऊन मोबाईल संदेश पाठविण्यात आलेले असून आजपर्यंत ९४.३४ %टक्के काम झालेले आहे.

ज्यांचा ऑनलाईन अर्ज भरतांना कागदपत्राच्या बाबतीत काही त्रुट्या आढळून आले आहेत. त्याांच्या मोबाईलवर संदेश जात असून अश्या अर्जदार महिलांनी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेअंतर्गत नारी शक्ती दूत ॲपच्या माध्यमातून ज्या मोबाईल ॲप वरून ऑनलाइन अर्ज भरला आहे त्यााच मोबाईल मधून अर्ज दुरूस्त (एडिट) करून अर्जाची त्रुटी पूर्तता पूर्ण करून घ्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे. ज्या महिला अर्जदारांनी अर्जासोबत आवश्यक सर्व कागदपत्रे जोडलेले आहेत त्याांचे अर्ज स्वीकृती देण्यात येत आहे. व तसा संदेश महिला अर्जदारांच्या मोबाईलवर जात आहे. स्वीकृती असा संदेश आल्यास आपला अर्ज यशस्वीरिता भरला गेला असल्याचे कळते. तथापि ज्या महिला अर्जदारांना आपला अर्ज पार्शली रिजेक्टेड असा मोबाईल संदेश आलेला आहे त्याांनी तात्काळ नारी शक्ती दूत ॲपच्या माध्यमातून ज्या मोबाईल ॲप वरून ऑनलाइन अर्ज भरला आहे त्यााच मोबाईल ॲप मधून अर्ज एडिट करून अर्जाची त्रुटी पूर्तता पूर्ण करून घ्यावी, असे आवाहन, जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी केले आहे.



**९४.३४% अर्जांची छाननी करून स्वीकृती मोबाईल संदेश**

## केज-अंबाजोगाई विधानसभा मतदारसंघाचे आमदार व त्यांचे रिमोट एकनिष्ठतेपासून कोसोदूर

### कपडे बदलल्यासारखे पक्ष बदलतात - ॲड. शेख शफीक भाऊ

केज/अंबाजोगाई (प्रतिनिधी) - एआयएमआयएम पक्षाचे बीड जिल्हाध्यक्ष ॲड. शेख शफिक भाऊ यांचा बीड जिल्हा दौरा नुकताच आयोजित करण्यात आला होता. या दौऱ्यादरम्यान केज-अंबाजोगाई विधानसभा मतदारसंघात घेतलेल्या बैठकीत शफिक भाऊंनी वरील उद्गार काढले.

या बैठकीत जिल्हा मुख्य प्रवक्ते तथा अंबाजोगाई प्रभारी शेख रमीज सर, अंबेजोगाई शहराध्यक्ष हिफाजत पठाण, केज शहराध्यक्ष तालेब इनामदार, केज कार्याध्यक्ष शाकेर कुरैशी, अंबाजोगाई युवक शहराध्यक्ष फहीम शेख, नेकनुर सर्कल अध्यक्ष अन्वर हाशमी, केज चे सय्यद सोहेल, रईस शेख, सय्यद आजीम, शहेबाज शेख, फेरोज पठाण, तय्यब पठाण, रमजान पठाण, शेख खाजा, शफियोद्दीन इनामदार, नय्यर इनामदार, आझम बागवान, नाजेम शेख, समीर शेख, आमेर तंबोली, नेकनुर चे वाजेद भाई, वसीम भाई, आमेर भाई, सय्यद सलाम, सय्यद आदील, अजीम दादा, रमजान भाई यांच्यासह अनेक पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर केज-अंबाजोगाई विधानसभा मतदारसंघातील पक्षाच्या पदाधिकाऱ्यांसह कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करताना शफिक भाऊ म्हणाले की, विधानसभा निवडणुका लवकरच होणार आहे. यासाठी पक्षाचे प्रत्येक पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी खांद्याला खांदा लावून जनतेसह पक्षाची कामे करावीत. अडीअडचणी सोडवाव्यात. आगामी विधानसभा निवडणूक एमआयएम पक्ष संपूर्ण ताकदीनिशी लढणार आहे. याकरिता प्रत्येकाने तन-मन-धन झोकून काम करायचे आहे. येथील विधानसभा मतदारसंघाच्या विद्यमान आमदार व त्यांचे रिमोट एकनिष्ठतेपासून कोसोदूर असून आजपर्यंतचा ◀◀ पान ३ वर



## कवडगाव येथील जि.प. शाळेतील शौचालयाची दुरावस्था

**वडवणी । प्रतिनिधी**

वडवणी तालुक्यातील कवडगाव हे पंचायत समिती सर्कलचे गाव असून या ठिकाणी जिल्हा परिषदेची सातवीपर्यंत शाळा असून या शाळेत गेल्या अनेक वर्षापासून स्वच्छालयाची दुरावस्था झाली आहे. शाळेला स्वच्छालय नसल्यामुळे विद्यार्थी विद्यार्थिनींची गैरसोय होत आहे. या गंभीर घटनेची दखल संबंधित शिक्षक विभागाने घ्यावी तसेच गेल्या चार-पाच महिन्या पूर्वी स्वच्छालय उभारण्यासाठी रेडिमेट सामायन शाळेत येऊन पडले आहे. अजून पर्यंत शाळेसाठी स्वच्छालय उभारले नाही.हे सामायन शाळेत टाकून संबंधित कंत्राटदार ◀◀ पान ३ वर



## अंबाजोगाईच्या तरुणाचा परळीला जाताना घाटात अपघाती मृत्यू

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

मागील महिन्यात नवीन घेतलेल्या पल्सर गाडीचा हप्त भरण्यासाठी परळीला निघालेले निलेश नेमीचंद महाजन (रा. जैन गल्ली, अंबाजोगाई) यांचे गाडीवरील नियंत्राण सुटल्याने झालेल्या अपघातात जागीच मृत्यू झाला. हा अपघात परळीच्या घाटात मंगळवारी (दि.०६) दुपारी झाला.

सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, निलेश महान (वय ४०) यांनी मागील महिन्यात परळी येथून नवीकोरी पल्सर दुचाकी घेतली होती. या दुचाकीचा पहिला हप्ता भरण्यासाठी ते एकटेच मंगळवारी दुपारी परळीला निघाले होते. ते घाटात आले असता त्यांचे दुचाकीवरील नियंत्रण सुटले आणि गाडी घसरून रोडच्या बाजूला गेली. या अपघातात निलेश यांच्या डोक्याला गंभीर इजा झाल्याने त्याांचा जागीच मृत्यू झाला. मयत निलेश महाजन यांच्या पार्थिवावर मंगळवारी सायंकाळी अंबाजोगाई येथील बोरुळा तलाव स्मशानभूमीत अंत्यासंस्कार करण्यात आले. त्याांच्या पश्चात आई, वडील, पत्नी, एक मुलगा आणि एक मुलगी असा परिवार आहे. निलेश यांच्या अकाली मृत्यूने अंबाजोगाई शहर्ता हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.



## आ.क्षीरसागरांच्या मध्यस्थीने कंत्राटी कर्मचाऱ्यांचे उपोषण मागे

**बीड । प्रतिनिधी**

बीड शहराला पाणी पुरवठा करणाऱ्या काडीवडगाव प्रकल्पावरील कंत्राटी कामगारांचे वेतनासाठी सुरु असलेले उपोषण आ.संदीप क्षीरसागरांच्या मध्यस्थीने बुधवारी (दि.७) रोजी कर्मचाऱ्यांनी मागे घेतले.

माजलगाव बॅकवॉटर मधून बीड शहरासाठी पाणी पुरवठा करणाऱ्या काडीवडगाव प्रकल्पावरील कंत्राटी कामगारांचे गेल्या अनेक दिवसांपासूनचे वेतन न मिळाल्याने उपोषणाला बसले होते. यावर आ. संदीप क्षीरसागर यांनी काडीवडगाव प्रकल्प येथील उपोषणस्थळी भेट घेऊन उपोषणकर्ते व प्रशासन यांच्यात मध्यस्थी करत कर्मचाऱ्यांना उपोषण मागे घ्यायला लावले. उपोषणकर्त्याा कामगारांच्या मागण्या शासनदरबारी लावून धरू व त्याांना न्याय मिळवून देऊ असे आ. क्षीरसागर यांनी उपोषणकर्त्यांना आश्वस्थ केले. यावेळी बीड नगरपालिकेच्या मुख्याधिकारी नीता अंधारे, संबंधित विभागाचे अधिकारी यांची उपस्थिती होती.



**काडीवडगाव प्रकल्पावरील बसले होते उपोषणास**

## उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सहकार्याने अतूल सावे यांच्या प्रयतामुळे अरण तीर्थक्षेत्राला मिळाले शंभर कोटी -ॲड.सतीश शिंदे

**बीड । प्रतिनिधी**

संपूर्ण राज्यातील माळी समाजाचे श्रद्धास्थान असलेल्या श्रीक्षेत्र अरण येथे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सहकार्यातून शंभर कोटी रुपयांचा निधी मिळाला असून सदरील तीर्थक्षेत्राला मिळाला आहे. या कामाच्या मंजुरीसाठी मंत्री अतुलजी सावे यांच्या विशेष प्रयताला यश मिळाले आहे. अरण तीर्थ क्षेत्राला अ दर्जा व १०० कोटी निधी दिल्याबद्दल महात्मा फुले युवा दलाचे संस्थापक प्रमुख ॲड. सतीश शिंदे यांनी आभार मानले आहेत.

सोलापूर जिल्ह्यातील अरण येथे श्री संत शिरोमणी सावता महाराज यांचे संजीवनी समाधी स्थळ आहे. या तीर्थक्षेत्राच्या विकासासाठी मंत्री अतुलजी सावे यांनी विशेष प्रयत केले. याचाच एक भाग म्हणून उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विशेष बाब म्हणून अरण येथील तीर्थक्षेत्राला शंभर कोटी रुपयांचा निधी जाहीर केला आहे. याबरोबरच मागील अनेक वर्षापासून अरण येथील तीर्थक्षेत्राला अ दर्जा द्यावा, अशी मागणी राज्यातील समस्त समाज बांधवांची होती. या मागणीचा पाठपुरावा मंत्री अतुलजी सावे करत होते. अखेर दोन दिवसापूर्वी राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ना. अतुल सावे यांच्या मागणीचा विचार करत तीर्थक्षेत्राला अ वर्ग तीर्थक्षेत्राचा दर्जा देऊन १०० कोटी रुपयांचा निधी जाहीर केला आहे. या निर्णयाचे सर्वत्र स्वागत होत आहे.

अरण येथे झालेल्या तीर्थ विकास कार्यक्रमाला उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, मंत्री छगन भुजबळ, आ. योगेश टिळेकर, आ. जयकुमार गोरे, रुपालीताई चाकणकर, आ. राम शिंदे, आदींची उपस्थिती होती. दरम्यान महात्मा फुले युवा दल यांच्या वतीने उपस्थित मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. मान्यवरांना क्रेनच्या साह्याने पुष्पहार घालण्यात आला. यावेळी महात्मा फुले युवा दलाचे संस्थापक प्रमुख ॲड. सतीश शिंदे यांच्यासह राज्यातील सर्व महात्मा फुले युवा दलाचे जिल्हाप्रमुख व पदाधिकारी उपस्थित होते. अरण येथील तीर्थक्षेत्राचा विकास व्हावा यासाठी अनेक वर्षापासून प्रयतशील आहेत. विशेष म्हणजे अतुल सावे हे मंत्री असताना देखील ४ तारखेच्या कार्यक्रमाच्या नियोजनासाठी दहा दिवसात दोन वेळा अरण येथील दौरे करून कार्यक्रमाच्या नियोजनासाठी वेळ दिला. स्वतः उभे राहून कार्यक्रमाचे संपूर्ण नियोजन मंत्री अतुल सावे यांनी केले. त्याांच्या या साधेपणाचे कौतुक समाज बांधवांकडून होत आहे.



## सैदापूर येथे आजपासून अखंड हरीनाम सप्ताह वै.दिंगाबर महाराज यांची ३४ वी पुण्यतिथी

**फुलसांगवी । प्रतिनिधी**

वै. दिंगाबर महाराज यांच्या ३४ पुण्यतिथी निमित्त मौजे सैदापूर येथे महंत शिवाजी महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली आज पासून सामुदायिक ज्ञानेश्वरी पारायण सोहळा व अखंड हरिनाम सप्ताह धोबी स्वरूपात आज पासून सुरू होत आहे.

गेवराई तालुक्यातील मौजे सैदापूर येथे वै. दिगांबर महाराज महाराज यांच्या पुण्यतिथी निमित्त वै. महादेव महाराज यांच्या प्रेरणेतून करण्यात आलेल्या हरिनाम सप्ताहाची परंपरा गेल्या ३४ वर्षापासून आज पर्यंत अखंडित चालू आहे. ही परंपरा श्री क्षेत्र नारायण गडाचे मठाधिपती महंत शिवाजी महाराज मार्गदर्शनाखाली वर्षानुवर्षी व्यापक रूप घेऊ लागली आहे. वै.दिगंबर महाराज ३४ व्या पुण्यतिथीनिमित्त अखंड हरिनाम सप्ताह आजपासून या सप्ताहाला पंचक्रोशीतून मोठ्या संख्येने भाविक भक्त उपस्थित राहणार आहेत. भाविक भक्तांना अध्यात्माचे ज्ञान व्हावे व समाज जनजागृती व्हावी या साठी ग्रामस्थांच्या ◀◀ पान ३ वर

### श्रीरंग महाराज डोंगरे यांची भागवत कथा

सप्ताह दरम्यान दुपारच्या वेळी भाविक भक्तांना अध्यात्माचे ज्ञान प्रबोधन मिळावे यासाठी ग्रामस्थांच्या वतीने ह भ प. महंत श्रीरंग महाराज डोंगरे ( गौतम ऋषी संस्थान घोलपदरा ) यांच्या संगीत श्रीमद्? भागवत कथेचे आयोजन करण्यात आले. ही कथा म्हणजे पंचक्रोशीतील भाविक भक्तांना अध्यात्माची पर्वणी लाभणार असल्याने या कार्यक्रमाला हजारो भाविक भक्त उपस्थित राहतील सांगितले जात आहे.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# शहरातील खड्डे बुजविण्याचे काम युद्धपातळीवर सुरु



शहरातील रस्त्यांवर असलेले खड्डे बुजविण्यासाठी विशेष पथकाद्वारे युद्धपातळीवर काम सुरू असून नागरिकांकडून प्राप्त झालेल्या खड्ड्यांबाबतच्या तक्रारींचे तातडीने निराकरण करण्याच्या सूचना आयुक्त शेखर सिंह यांनी दिल्या आहेत.


शहरातील आढळून आलेल्या खड्ड्यांपैकी महापालिकेच्या वतीने आतापर्यंत सुमारे ९८९ खड्डे बुजविण्यात आले असून क्षेत्रीय कार्यालयनिहाय ८ स्वतंत्र पथकांमार्फत खड्डे बुजविण्याची कार्यवाही युद्धपातळीवर सुरू आहे. तसेच उर्वरित खड्डे तातडीने बुजविण्याबाबत संबंधित अधिकाऱ्यांना सूचना देण्यात आल्या आहेत.

खड्डे बुजविण्यासाठी नेमलेल्या पथकाने सर्व भागांची पाहणी करून बुजविलेल्या खड्ड्यांबाबतचा दैनंदिन अहवाल सादर करण्याबाबत सूचना देण्यात आल्या आहेत. तर कोणत्याही भागात खड्ड्यांबाबत आलेल्या (झउचउ) तक्रारींचे तात्काळ निराकरण करण्याचे निर्देश सर्व पथकांना देण्यात आलेले आहेत, अशी माहिती शहर अभियंता मकरंद निकम यांनी दिली आहे. महापालिकेच्या सर्व क्षेत्रीय कार्यालयांच्या स्तरावर खड्डे बुजविण्यासाठी फिरते पथके नेमण्यात आले आहेत. तसेच क्षेत्रीय अधिकारी आणि स्थापत्य कार्यकारी अभियंता यांच्या आधिपत्याखाली असलेले संबंधित अधिकारी कर्मचाऱ्यांसोबत परिसरातील रस्त्यांची पाहणी करून खड्डे बुजविण्याची मोहीम राबविण्यात येत आहे. रस्त्यांमध्ये आढळून आलेले खड्डे बुजविणे, पाण्याचा निचरा करण्यासाठी मार्ग करून देण्याबाबतची कार्यवाही पथकांमार्फत जलदगतीने करण्याबाबत सूचना देण्यात आल्या आहेत.याव्यतिरिक्त, रस्त्यांवर बेकायदेशीरपणे बांधकाम साहित्य ठेवणे, अतिक्रमण करणे, राडारोडा टाकणे, रस्त्यांमध्ये बेकायदेशीरपणे खोदकाम करणे, चर खोदणे असे प्रकार आढळून आल्यास संबंधितांवर दंडात्मक कारवाई करण्यात येत आहे, असेही शहर अभियंता मकरंद निकम यांनी सांगितले. खड्डे बुजविण्याच्या कामासाठी २१ जेसीबी, ७ हॅण्ड रोलर, ३२ टेम्पो, १ हॅण्ड कॉम्पेक्टर, १४ ट्रॅक्टर, ४ ब्रेकर आणि १ डम्पर आदी मशिनरींचा वापर करण्यात आला.

# पार्ट टाइम जॉबच्या बहाण्याने महिलेची फसवणूक

**पिंपरी । प्रतिनिधी**

पार्ट टाइम जॉबच्या नावाखाली एका तरुणीची ४ लाख ७५ हजार रुपयांची फसवणूक करण्यात आली. ही घटना २२ जून ते २७ जून २०२४ या कालावधीत वाल्हेकरवाडी, चिंचवड येथे घडली.




याबाबत एका ३३ वर्षीय महिलेने मंगळवारी (दि. ६) चिंचवड पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी मालकॉल्म मोबाइल नंबर ९६६१७४९४१२ साराखा तुमसारा मोबाइल नंबर ९६५०१५३५४६ व्हॉट्सॲप ग्रुप ॲडमिन स्वामी देवराज मोबाइल नंबर ८९७१८१५२०७ यांच्यासह एकूण २३ जणांच्या विरोधात गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपींनी आपसांत संगनमत करून फिर्यादी यांना पार्टटाईम जॉब देण्याचे आमिष दाखविले. त्यासाठी पैसे भरण्यास सांगून फिर्यादी यांचा विश्वास संपादन केला. फिर्यादी यांच्या मोबाईल नंबर यावर व्हॉट्सॲप व टेलिग्राम टास्कद्वारे मेसेजेस पाठवुन फिर्यादी यांची एकूण ४ लाख ७५ हजार रुपयांची आर्थिक फसवणुक केली आहे. चिंचवड पोलीस याबाबत अधिक तपास करीत आहेत.

# जिल्ह्यात पावणेदहा हजार मुलांना मोफत प्रवेश ; ‘आरटीई’ प्रवेश प्रक्रिया,आणखी सहा हजार मुले बाकी

**पुणे । प्रतिनिधी**

केंद्र पुरस्कृत बालकांना मोफत व सक्तीचे शिक्षण कायद्यातील (आरटीई क्ट) तरतुदीनुसार पुणे व पिंपरी चिंचवड शहर व जिल्ह्याच्या ग्रामीण भागातील मिळून आतापर्यंत ९ हजार ३७३ मुलांना विविध शाळांमध्ये मोफत प्रवेश मिळाले आहेत. या कायद्यातील तरतुदीनुसार निवड झालेल्या एकूण मुलांपैकी ९३४ मुलांना प्रवेश नाकारण्यात आले असून, अन्य ४० मुलांनी निवड होऊनही, अद्याप संबंधित शाळांशी संपर्क साधला नसल्याचे दिसून आले आहे.



या कायद्यातील तरतुदीनुसार मोफत प्रवेशासाठी पुणे शहर व जिल्ह्यातील एकूण १६ हजार ३३७ मुलांची निवड झाली होती. या सर्व मुलांना मिळून एकूण ९७० शाळांमध्ये हे मोफत प्रवेश दिले जाणार होते. त्यापैकी आतापर्यंत ९ हजार ३७३ मुलांनी प्रवेश घेतले आहेत. प्रवेश घेण्याचे हे प्रमाण ३६.६७ टक्के इतके असल्याचे जिल्हा शिक्षणाधिकारी (प्राथमिक) संजय नाईकडे यांनी सांगितले.


‘प्रवेश नाकारणाऱ्या शाळांवर गुन्हा’

दरम्यान, बालकांना मोफत व सक्तीचे शिक्षण कायद्यातील तरतुदीनुसार प्रवेश मिळालेल्या विद्यार्थ्यांना मोफत प्रवेश देणे, हे संबंधित शाळांवर बंधनकारक आहे. तरीही काही शाळा या विद्यार्थ्यांना प्रवेश नाकारत असल्याचे आढळून आले आहे. या विद्यार्थ्यांना प्रवेश नाकारणाऱ्या शाळांवर फौजदारी गुन्हे दाखल करण्यात येणार असल्याचे जिल्हा शिक्षणाधिकारी (प्राथमिक) संजय नाईकडे यांनी बुधवारी (ता.७) सांगितले

# जेष्ठ अभिनेत्री रोहिणी हट्टंगडी यांना जीवनगौरव पुरस्कार जाहीर

पिंपरी चिंचवड

अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद पिंपरी चिंचवड शाखेच्या २७ व्या वर्धापन दिनानिमित्त ज्येष्ठ नाट्य- चित्र अभिनेत्री रोहिणी हट्टंगडी यांना पहिला जीवन गौरव पुरस्कार देण्यात येणार असल्याची माहिती परिषदेच्या पिंपरी चिंचवड शाखेचे अध्यक्ष भाऊसाहेब भोईर यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिली. अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेच्या वतीनं दरवर्षी वर्धापन दिनानिमित्त नाट्य व इतर सांस्कृतिक क्षेत्रातील राज्य व स्थानिक कलाकारांना पुरस्कार देऊन गौरवण्यात येत आहे. यंदापासून नाट्य चित्रक्षेत्रातील सन्माननीय जेष्ठ कलावंताला जीवन गौरव पुरस्कार देऊन गौरवण्यात येत आहे. यंदाचा पहिला जीवनगौरव पुरस्कार ज्येष्ठ नाट्य- चित्र अभिनेत्री रोहिणी हट्टंगडी यांना प्रदान करण्याचे निश्चित झाले आहे.




येत्या ९ ऑगस्टला संध्याकाळी ५.३०/वाजता चिंचवड येथील प्रा. रामकृष्ण मोरे प्रेक्षागृहात हा सोहळा संपन्न होणार आहे. सदर कार्यक्रम अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद, मध्यवर्ती संघटनेचे प्रमुख कार्यवाह अजित भुरे यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न होणार आहे.पुरस्कार सोहळ्यानंतर अजित भुरे हे रोहिणी हट्टंगडी यांची प्रकट मुलाखत घेणार आहेत. याबरोबरच प्रसिद्ध निवेदक श्रीकांत चौगुले, अभिनेता पंकज चव्हाण, अभिनेत्री कोमल शिरभाते, लावणी नृत्यांगना आशा रुपा परभणीकर व नाट्यकर्मी नटराज जगताप यांच्यासह अजून काही सन्माननीय कलावंतांना, त्यांच्या आजवरच्या कार्यासाठी गौरविण्यात येणार आहे. तसेच पिंपरी चिंचवड शहरामधून विधानपरिषदेवर नुकतीच नियुक्ती झालेले कलाप्रेमी श्री अमित गोरखे यांचा विशेष सत्कार होणार आहे.

रोहिणी जयदेव हट्टंगडी या अशा एकमेव भारतीय कलाकार आहेत, की ज्यांना इऋ- अर्थात ब्रिटिश फिल्म अकॅडमी अवॉर्ड प्राप्त झाले आहे. त्यांना हे पारितोषिक सर्वोत्तम सहाय्यक अभिनेत्री म्हणून रिचर्ड टनबरो निर्मित ‘ गांधी ‘या चित्रपटातील कस्तुरबा गांधी यांच्या भूमिकेसाठी मिळाले आहे. मूळच्या पुण्याच्या असलेल्या रोहिणी ताई यांनी नॅशनल स्कूल ऑफ ड्रामा दिल्ली येथे प्रवेश घेतला होता. त्या कथकली आणि भरतनाट्यम ही शिकल्या. त्यांनी (जयदेव हट्टंगडी) पतीबरोबर सुरू केलेल्या ‘ आशीर्वाद ‘ संस्थेद्वारे दीडशे नाटकांची निर्मिती व अनेक नाटकात अभिनय केला.त्यांचे चित्रपटातील पदार्पण , १९७८ साली सईद अख्तर मिर्झा यांच्या ‘ अरविंद देसाई की अजिब दास्तान ‘ या चित्रपटात द्वारे झाले. त्यांना दोन वेळा फिल्म फेअर अवॉर्ड आणि एकदा राष्ट्रीय फिल्म पुरस्कार देऊन गौरविण्यात आले आहे.

## पीएमपीच्या धडकेत महिलेचा मृत्यू !

**चाकण । प्रतिनिधी**

भरधाव वेगातील पीएमपीएमएलच्या बसने धडक दिल्यामुळे पादचारी महिलेचा मृत्यू झाला. ही घटना मंगळवारी (दि. ६) रात्री पावणे नऊ वाजताच्या सुमारास नाणेकरवाडी, चाकण येथे घडली. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मंगळवारी रात्री पावणे नऊ वाजताच्या सुमारास फिर्यादी यांची पत्नी आशा या बालाजीनगर बस थांब्याजवळ रस्ता ओलांडत होत्या. त्यावेळी भरधाव वेगात आलेल्या पीएमपीएमएल बस (एमएच १४ एचयू ४७८३) हिने जोरदार धडक दिली. या अपघातात आशा यांचा मृत्यू झाला. चाकण पोलीस अधिक तपास करीत आहेत.

# सेंट जॉर्ज रुग्णालयातील कर्मचाऱ्याचा उपचाराअभावी मृत्यू, दोन डॉक्टरांचे निलंबन

मुंबई । प्रतिनिधी

सेंट जॉर्ज रुग्णालयातील कर्मचाऱ्यालाच वेळेवर उपचार न मिळाल्यामुळे त्याचा मृत्यू झाला असून या प्रकरणी दोन डॉक्टरांचे निलंबन करण्यात आलं आहे. विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकरांनी हे कारवाईचे आदेश दिले अशून या प्रकरणी ते गुरुवारी दुपारी विधीमंडळात बैठकही घेणार आहेत. रुग्णालयातील सीसीटीव्ही फुटेज तपासून कठोर कारवाई करण्याचे पोलिसांना आदेश देण्यात आले आहेत. अनिस चव्हाण असं मृत कर्मचाऱ्याचं नाव आहे.




रुग्णालयातील कर्मचाऱ्यालाच वेळेवर उपचार न मिळाल्याने मोठा वाद निर्माण झाला होता. मृताचे नातेवाईक आणि सहकारी कर्मचाऱ्यांनी या घटनेनंतर डॉक्टर आणि व्यवस्थापनाशी वाद घातल्याने काही काळ गोंधळाचं वातावरण निर्माण झालं होतं. त्या परिस्थितीवर नियंत्रण मिळवण्यासाठी स्थानिक पोलीस रुग्णालयात दाखल झाले होते.

रुग्णालयात गोंधळाचं वातावरण

सेंट जॉर्ज रुग्णालयातील चतुर्थ श्रेणी कर्मचारी चव्हाण यांच्या डोक्याला एका अपघातात दुखापत झाली होती. त्यामुळं त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आलं होतं. त्यांना वेळेवर उपचार न मिळाल्याने मृत्यू झाल्याचा आरोप चव्हाण कुटुंबीय आणि सहकर्मचाऱ्यांकडून करण्यात आला. त्यामुळे रुग्णालयात गोंधळाचं वातारण निर्माण झालं होतं. त्या परिस्थितीवर नियंत्रण मिळवण्यासाठी स्थानिक पोलीस रुग्णालयात दाखल झाले होते.

राहुल नार्वेकरांनी बैठक बोलावली

सेंट जॉर्ज रुग्णालय घटनेप्रकरणी तातडीने कारवाई करत दोन डॉक्टरांचे निलंबन करण्यात आलं आहे. या प्रकरणी विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर गुरूवारी दुपारी १२ वाजता एक बैठक घेणार आहेत. या बैठकीला वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ आणि महत्त्वाचे अधिकारी उपस्थित राहणार आहेत.

# माळवाडी जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या कामाचे भूमिपूजन

पुणे । प्रतिनिधी

माळवाडी जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या दुसऱ्या मजल्यावरील बांधकामाचे भूमिपूजन लोकप्रतिनिधी,ज्येष्ठ नागरिक आणि युवकांच्या उपस्थितीत मंगळवारी (दि. ६) संपन्न झाले. दुसऱ्या मजल्यावरील सात वर्ग खोल्यांच्या बांधकामासाठी ३० लाख रुपयांचा निधी आमदार सुनील शेळके यांच्या माध्यमातून मिळाला आहे.




यावेळी सरपंच पल्लवी संदीप दाभाडे, उपसरपंच पूजा मयूर दाभाडे,दिपक दाभाडे सदस्य,विदुर पचपिंड सदस्य, मनिषा दाभाडे सदस्य,पल्लवी मराठे सदस्य, पूनम अल्हाट सदस्य, रेश्मा दाभाडे सदस्य,जयश्री गोठे सदस्य, जी एस खोमणे ग्रामविकास (ढरश्रशसरेप ऊरलहरवश) अधिकारी, शाळेचे मुख्याध्यापक व सर्व शिक्षकवृंद,विद्यार्थी व गावातील ज्येष्ठ व इतर पदाधिकारी गोरख तात्या दाभाडे,बजरंग जाधव,नामदेव दाभाडे, बाळासाहेब दाभाडे,अशोक का. दाभाडे,सुदाम आल्हाट ,बाळासाहेब जाधव,सुनिल नाना भोंगाडे,अशोक की. दाभाडे,पंढरीनाथ पानसरे, रोहिदास म्हसे,रोहिदास मराठे,गणेश दाभाडे,दिलीप दाभाडे,बाळासाहेब दाभाडे,मयूर दाभाडे, गोरख श. दाभाडे,संदीप दाभाडे,पूजा दाभाडे, सचिन दाभाडे उपस्थित होते.

# शहरातील ‘या’ भागाचा पाणीपुरवठा विस्कळीत

**पिंपरी-चिंचवड । प्रतिनिधी**

शहरातील चऱ्होली, मोशी, डुडुळगाव, चोविसावाडी, वडमुखवाडी, देहू - आळंदी रस्ता बोऱ्हाडेवाडी, चक्रपाणी वसाहत, अक्षयनगर तसेच इंद्रायणीनगर या भागात आज दि.७ ऑगस्ट २०२४ रोजी मध्यरात्री होणारा पाणीपुरवठा व उद्या दि.८ ऑगस्ट २०२४ रोजी सकाळी होणारा पाणीपुरवठा कमी दाबाने होईल, अशी माहिती महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागाच्या वतीने देण्यात आली आहे.

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या पाणीपुरवठा विभागांतर्गत निघोजे बंधाऱ्यावरून उचलल्या जाणाऱ्या अशुद्ध जलउपसा केंद्रावरील विद्युत पुरवठा ७ ऑगस्ट २०२४ च्या मध्यरात्री अडीच वाजलेपासून बंद असल्यामुळे चिखली जलशुद्धीकरण केंद्राकडे होणारा पाणीपुरवठा पूर्णत: बंद झालेला आहे. त्यामुळे चिखली जलशुद्धीकरण केंद्रावरून चऱ्होली, मोशी, डुडुळगाव, चोविसावाडी, वडमुखवाडी तसेच देहू - आळंदी रस्ता बोऱ्हाडेवाडी, चक्रपाणी वसाहत, अक्षयनगर, इंद्रायणीनगर या भागातील आज दि. ७ ऑगस्ट २०२४ रोजी मध्य रात्री होणारा पाणीपुरवठा व उद्या दि.८ ऑगस्ट २०२४ रोजी सकाळी होणारा पाणीपुरवठा कमी दाबाने होणार आहे. नागरिकांनी पाणी जपून वापरावे असे आवाहन महापालिकेच्या वतीने करण्यात आले आहे. सध्या पावसाळ्याचे दिवस असल्याने पिण्याच्या पाण्यातून जलजन्य रोगांचा प्रसार होण्याची दाट शक्यता असते. त्यामुळे नागरिकांच्या आरोग्यास बाधा निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. नागरिकांना स्वच्छ व शुध्द पाणीपुरवठा करण्याच्या दृष्टीने पिंपरी चिंचवड महापालिकेमार्फत आवश्यक खबरदारी घेण्यात येत आहे. तरी दक्षतेची खबरदारी म्हणून नागरिकांनी पिण्याचे पाणी गाळून आणि उकळून प्यावे, असे आवाहन महापालिकेच्या वतीने करण्यात आले आहे.

# विधानसभा निवडणुकीसाठी जिल्ह्यात ८४ लाख मतदार ; प्रारूप मतदारयादी जाहीर,चिंचवड सर्वात मोठा मतदारसंघ

**पुणे । प्रतिनिधी**

पुणे व पिंपरी चिंचवड शहर व जिल्ह्याच्या ग्रामीण भागातील मिळून जिल्ह्यातील २१ विधानसभा मतदारसंघातील एकूण मतदारांची संख्या ८४ लाख ३९ हजार ७२९ इतकी झाली आहे. एकूण मतदारांमध्ये ४४ लाख ३ हजार ३४४ पुरुष, ४० लाख ३५ हजार ६४० महिला आणि ७४५ तृतीयपंथी मतदारांचा समावेश आहे. चिंचवड विधानसभा मतदारसंघ हा मतदारांच्या संख्येनुसार जिल्ह्यात सर्वात मोठा मतदारसंघ ठरला आहे. या विधानसभा मतदारसंघातील मतदारांची संख्या ही ६ लाख २७ हजार ४३७ इतकी झाली आहे.



भारत निवडणूक आयोगाच्या विशेष संक्षिप्त पुनरीक्षण कार्यक्रमानुसार जिल्ह्यात मतदार नोंदणी मोहीम राबविण्यात आली. या मोहिमेत नव्याने नोंदणी झालेल्या मतदारांसह सर्वच मतदारांची विधानसभानिहाय प्रारूप मतदारयादी जिल्हाधिकारी कार्यालयाने मंगळवारी (ता.६) प्रसिद्ध केली. यातून शहर व जिल्ह्यातील विधानसभानिहाय मतदारांची संख्या निश्चित झाली आहे. या प्रारूप यादीनुसार पुणे शहरातील कसबा पेठ हा सर्वात लहान विधानसभा मतदारसंघ ठरला आहे.

विधानसभानिहाय मतदारसंख्या

- जुन्नर --- ३ लाख १४ हजार ८३९- आंबेगाव --- ३ लाख ४ हजार २६६- खेड --- ३ लाख ५७ हजार १०५- शिरूर --- ४ लाख ४५ हजार ३००

- दौंड --- ३ लाख ७ हजार ४२- इंदापूर --- ३ लाख २५ हजार ५४०- बारामती ---३ लाख ७१ हजार ५७७- पुरंदर --- ४ लाख ३६ हजार ४१४

- भोर --- ४ लाख १२ हजार ४१४- मावळ --- ३ लाख ७५ हजार ७७०- चिंचवड --- ६ लाख २७ हजार ४३७ - पिंपरी --- ३ लाख ७७ हजार २५१

- भोसरी --- ५ लाख ५८ हजार ९५९- वडगाव शेरी --- ४ लाख ७६ हजार ५३८- शिवाजीनगर --- २ लाख ८१ हजार ८३१- कोथरूड --- ४ लाख २१ हजार ७९- खडकवासला --- ५ लाख ४५ हजार ८९३- पर्वती --- ३ लाख ४४ हजार ७३९- हडपसर --- ५ लाख ९० हजार ६११- पुणे कॅन्टोन्मेंट --- २ लाख ८६ हजार ५१८- कसबा पेठ --- २ लाख ७८ हजार ६०६

येत्या २० ऑगस्टपर्यंत हरकती घेता येणार

दरम्यान,या प्रारूप मतदार यादीवर नागरिक आणि मतदारांना येत्या २० ऑगस्टपर्यंत दावे व हरकती सादर करता येणार आहेत. प्रारूप मतदार यादीत नाव नसलेल्या पात्र मतदारांना याच कालावधीत मतदार यादीत नाव नोंदणीसाठीचा अर्ज नमुना क्रमांक ६, नाव समाविष्ट करण्यास हरकत, यादीत यापूर्वीच समाविष्ट असलेले नाव वगळणे, स्थलांतर झाल्यामुळे नाव वगळणे आदींसाठी नमुना क्रमांक. ७, पत्ता बदल, तपशिलात दुरुस्ती, दुबार इपीक कार्ड मिळणे आदींसाठी नमुना क्रमांक . ८ हे अर्ज ऑनलाइन पद्धतीने भरता येणार असल्याचे उप जिल्हा निवडणूक अधिकारी मीनल कळसकर यांनी सांगितले.